अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

## पुण्याचा अभिजीत कटके हिंदकेसरीचा मानकरी



पुणे : भारतीय शैली कुस्ती महासंघाने दिनांक ५ जानेवारी ते ८ जानेवारी दरम्यान हैदराबाद, तेलंगणा येथे अखिल भारतीय ५१ वी हिंदकेसरी कुस्ती स्पर्धा आयोजित केली होती. या मानाच्या स्पर्धेची गदा पुण्याचा जिगरबाज कुस्तीपटू अभिजीत कटके याने पटकावली आहे. पुण्याचा कुस्तीपटू अभिजीत कटकेने हरियाणाच्या सोमवीरला आस्मान दाखवू हिंदकेसरी किताब आपल्या नावावर केला. या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात अभिजीतने हरियाणाच्या सोमवीरवर एकदाही वरचढ होण्याची संधी दिली नाही. अभिजीतने ४ -० ने मात करत हिंद केसरीच्या किताबावर आपलं नाव कोरलं. अभिजीत कटके हा पुण्याच्या गणेश पेठेतल्या शिवरामदादा तालमीचा आहे.अभिजीतला अमर निंबाळकर, भरत म्हस्के आणि हणमंत गायकवाडांचं मार्गदर्शन लाभलं आहे. अभिजीतनं २०१५ साली युवा महाराष्ट्र केसरीचा मान मिळवला होता. २०१६ साली त्यानं ज्युनियर राष्ट्रीय कुस्तीत कांस्यपदकाचा मान मिळवला होता.

पैलवान

www.surajyadigital.com | सोमवार, दि. ९ जानेवारी २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १०४ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

# सार्वजनिक नंगानाच मान्य आहे काय?

# सुप्रिया-रूपालींवर वाघांनी घातला घाव

सुराज्य/सोलापूर

**महाराष्ट्र प्रदेश भाजपच्या महिला अध्यक्षा चित्रा वाघ आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या खा. सुप्रिया सुळे-महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्यातील वाद विकोपाला गेला आहे. मुंबईची फॅशन मॉडेल उर्फी जावेद हिच्या प्रकरणावरून वाघ व सुळे-चाकणकर यांच्यात शाब्दिक चकमकी उडत आहेत. रविवारी सोलापूरच्या दौऱ्यावर आलेल्या वाघ यांनी उर्फीच्या प्रकरणावर सुप्रिया व चाकणकर यांनी घेतलेल्या भूमिकेवर जबरदस्त घाव घातला. उर्फीच्या माध्यमातून सार्वजनिक ठिकाणी चालणारा नंगानाच सुप्रिया-चाकणकर यांना मान्य आहे काय? असा सवाल वाघ यांनी पत्रकार परिषदेत उपस्थित केला. असला स्वैराचार आम्हाला मान्य नाही. समाजस्वास्थ्यासाठी आम्ही बोलत आहोत, तेव्हा सुप्रियांनी आम्हाला बोलण्यापेक्षा महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर ह्या बाईंचे पहिल्यांदा कान टोचावेत, असा सल्लाही वाघ यांनी दिला.**



उर्फीच्या हिडीस देहप्रदर्शनावरून राज्यात वादळ उठले आहे. वाघ यांनी उर्फीच्या या वर्तनाला विरोध केला असून तिच्या विरूद्ध पोलिसांकडे धाव घेतली आहे. इतके होवूनही उर्फी शांत बसत नाहीय. उलट तिचे अंगविक्षेप सुरूच असून वाघ यांना चित्रू चित्रू म्हणत हिणवले शिवाय माझे हे अंगप्रदर्शन असेच सुरू राहील, असे प्रतिआव्हान दिल्याने हा संघर्ष अधिकच चिघळला आहे.

वाघ यांनी महिला आयोगालाही टीकेचे लक्ष्य केले आहे. यावरून चाकणकर यांनीही वाघ यांना प्रत्युत्तर दिले. त्यानंतर वाघ यांना आयोगाकडून नोटीसही बजावण्यात आली. या वादात राजकारण शिरल्याचे दिसत आहे.

**असल्या ५६ नोटिसा पाहिल्या आहेत...**

वाघ यांनी चाकणकर यांच्या नोटीसाला प्रतिउत्तर दिले. मला अशा ५६ नोटिसा आल्या आहेत. त्याला मी घाबरत नाही. उर्फीच्या तोकड्या कपड्यांवरून वाघ यांनी वादळ उठवले आहे. राज्यात हे चालणार नाही, असे चाकणकर म्हणाल्या होत्या.या विधानाचा वाघ यांनी खरपूस समाचार घेतला. चाकणकर यांनी नोटीस पाठविली आहे. मला अशा ५६ नोटिसा आल्या आहेत. त्यात काही विशेष नाही. त्याला आम्ही उत्तर दिले आहे. महिला आयोगात त्या एकट्या नाहीत. आम्ही त्यांना दिलेले उत्तर महिला आयोगाने प्रसिद्ध करावे, असे आव्हान वाघ यांनी दिले आहे.

**इथे माती होत चाललीय**

अजितदादांची भूमिका मला आवडली. कारण त्यांनी रोखठोक भूमिका मांडली आहे. हे महिला महिलांचे सुरू आहे,असे अजितदादा म्हणाले होते. आता त्यांच्या पक्षातील महिलांना कळावे की संधीचे सोने करावे की माती? अजितदादांना कळले आहे, इथे माती होत चालली आहे, असे वाघ म्हणाल्या.

### गूळ-खोबरे दिले नव्हते...

सर्वांच्या सहमतीने एखाद्याला नोटीस द्यावी लागते. त्यामुळे चाकणकरांनी मला नोटीस देण्यापूर्वी कोणाची संमती घेतली होती का? आमचा लढा सुरु असताना चाकणकर यांना त्यामध्ये हस्तक्षेप करण्यासाठी आम्ही गूळ-खोबर देऊन बोलावले नव्हते तसेच सुळे यांनी आम्हाला सल्ला, आमच्यावर टिका करत समाजस्वास्थच्या विषयावर राजकारण करु नये,असा सल्ला वाघ यांनी दिला.

### पहिल्यांदा आपल्या बाईंचे कान टोचा

सुळेंनी देखील या वादात उडी घेत वाघ यांच्यावर बोलल्या होत्या. त्याबाबत वाघ यांनी सुप्रियांना सडेतोड उत्तर दिले. चाकणकर ह्या बाष्कळ विधान करतात. सुळेंना मान्य आहे का? रस्त्यावर नंगानाच सुरू असलेले? उर्फीचा हा नंगानाच आम्ही मान्य करणार नाही.चार भिंतीआड काय चालले आहे हे कुणी पाहात नसते. ही आमची भूमिका स्पष्ट आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याखाली राज्यामध्ये स्वैराचार नंगानाच सुरु आहे. या विरोधात बोलले तर नोटीस पाठवता ही कसली पद्धत? पहिल्यांदा आपल्या बाईचे कान टोचा. ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्राची संस्कृती नाही, असे सांगताना वाघ यांनी विरोधकांसह महिला आयोगावरही टीकास्त्र सोडले.

## पंढरीतील भाविकाला लुटणाऱ्या दोघांना दोन तासात अटक

सुराज्य/पंढरपूर

### तीस हजार आणि आधारकार्ड पोलिसांकडून जप्त

विठ्ठल मंदिराचा पत्ता विचारणाऱ्या भाविकाला दोघांनी मोटर सायकलवर बसून निर्जन ठिकाणी नेऊन जीवे मारण्याची धमकी देत लुटल्याची घटना घडली होती. पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत आरोपींना दोन तासात अटक केल्याची माहिती पोलीस निरीक्षक अरुण फुगे यांनी दिली.

पोलिसांनी मिळालेल्या माहितीनुसार विनायक बाबूराव वाडकर (वय ३०, वनाळी ता. कागल, जि. कोल्हापूर) हे शनिवारी पहाटे साडेतीनच्या सुमारास पंढरपूर येथे देवदर्शनाकरिता खाजगी वाहनाने आले होते. ते देवदर्शन करण्याकरिता पहाटे चारच्या सुमारास पायी चालत मंदिराकडे जात असताना छत्रपती शिवाजी चौक येथे आले. तेथे दोन अनोळखी इसम त्यांच्याकडे आले. तेव्हा वाडकर यांनी त्यांना विठ्ठल मंदिर येथून जवळ आहे का? असे विचारताच ते बोलेले की, आम्ही मंदिराकडे चाललो आहे. तुला सोडतो असे बोलून त्यांनी वाडकर यांना त्यांच्या मोटर सायकलवर मध्यभागी बसवून पुढे नेले.



नंतर तेथून गजानन महाराज मठाजवळून तसेच एका तळ्याजवळ निर्जन ठिकाणी घेऊन गेले. तेथे त्यांनी जिवे मारण्याची धमकी देऊन वाडकर यांच्या खिशातील पाकिट बळजबरीने काढून घेतले. पाकिटात ३० हजार रुपये व आधार कार्ड होते. ते दोघेजण पाकिट घेऊन फिर्यादी वाडकर यांना तेथेच सोडून आरोपी आपल्या मोटार सायकलवरून निघून गेले. याबाबत शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकारचे गुन्हे यापूर्वी केलेल्या आरोपींची गोपनीय माहितीदाराकडून माहिती मिळाल्यानंतर पोलीस हेडकॉन्स्टेबल सुरज हेंबाडे यांनी दोन तासांमध्ये अतिष ऊर्फ महादेव सगर, किरण वाडेकर (रा. पंढरपूर) या दोन्ही आरोपींना अटक केली. तसेच चोरीला गेलेले तीस हजार रुपये पॉकेट आणि आधार कार्डही चोरांकडून जप्त करण्यात आले आहेत. याप्रकरणी आरोपींना चार दिवस पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

## कर्ज मिळवून देतो म्हणून तब्बल एक कोटीची फसवणूक; मयत व्यक्तीसह तिघांवर गुन्हा

सुराज्य/सोलापूर

व्यवसायासाठी कर्ज मिळवून देतो म्हणून एका जेसीबी मशीन भाड्याने देणाऱ्यासह अनेक लोकांची १ कोटी ६ लाख ९५ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी मयत व्यक्तीसह तीन जणांविरुद्ध सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी रविराज सूर्यकांत कदम (वय-३८,रा.देगाव) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून मयत बजरंग ऊर्फ दीपक बन्सीसिंग लंगडेवाले,जितेंद्र बन्सी नाईकवाडे,सुजीत नाईकवाडे (सर्व.रा.कुमठे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास आर्थिक मंडळाचे कर्ज प्रकरण करून देतो,मी अनेक लोकांना लाखो करोडो रुपये कर्ज मिळवून दिले आहे. तुम्हाला तुमच्या व्यवसायासाठी १२ ते १५ करोड रुपये कर्ज मिळून देतो, असे फिर्यादी रविराज कदम यांना बजरंग लंगडेवाले म्हणाला.त्यानंतर फिर्यादी यांनी मी विचार करून सांगतो असे म्हणून निघून गेले.एका महिन्यानंतर फिर्यादी हे बजरंग लंगडेवाले व जितेंद्र बन्सी नाईकवाडे यांना मला कर्ज पाहिजे आहे असे जिल्हा परिषद आवारामध्ये भेटून सांगितले. त्यावर त्यांनी मला पंधरा कोटींचे लोन करायचे असेल तर मला ५० लाख रुपये द्यावे लागतील असे म्हणत,मी तुम्हाला महामंडळ कडून अडीच कोटींचे लोन व उर्वरित रक्कम मुंबई येथील चमडा व्यापारी इस्माईल रजाक, इमाम कुरेशी, इकबाल कुरेशी, अब्दुल मोहम्मद, बुरान कुरेशी यांचा भाचा व पुतण्या (नूर व अल्लाबक्ष) व मोईन कुरेशी यांचा असलेला अवैध काळा पैसा त्यांच्या ट्रस्टद्वारे आम्हाला उद्योग धंद्याकरिता दोन महिन्यात मिळून देतो असे सांगितले.त्यावेळी फिर्यादी यांचा भाऊ देखील सोबत असल्याने त्याला देखील रोड कंट्रक्शनच्या व्यवसायासाठी पैशाची गरज असल्याने त्याने सुद्धा दहा कोटी लोन मागितले.त्याला सुद्धा ५० लाख रुपये द्या तुम्हाला लोन मिळवून देतो असे सांगितले.त्यानंतर फिर्यादी यांनी १९ लाख ५० हजार व त्यांचा भाव विजय सूर्यकांत कदम यांनी पंधरा लाख दहा हजार रुपये बजरंग लंगडेवाले व जितेंद्र नाईकवाडे यांच्या दोघांच्या हातात दिले. त्यानंतर फिर्यादी व फिर्यादी यांच्या भावाकडून रक्कम व कागदपत्रे घेऊन तुमचे काम लवकरच होईल असे सांगून निघून गेले.तसेच फिर्यादी यांचा मित्र गणेश होटकर याला साडेतीन कोटींची लोन मिळवून देतो असे सांगून ३ लाख ५० हजार रुपये घेऊन फिर्यादी व फिर्यादीचा भाऊ विजय व मित्र गणेश यांना लोन न देता त्यांची फसवणूक केली आहे.

फिर्यादी प्रमाणेच आणखीन इतर लोकांकडून देखील रक्कम घेऊन एकूण १ कोटी ६ लाख ९५ हजार रुपये इतकी रक्कम वरील संशयित आरोपींनी स्वीकारून त्यांची देखील फसवणूक केली आहे. असे फिर्यादीत नमूद आहे.घटनेचा पुढील तपास पोसई मंद्रुपकर हे करीत आहेत.

### फोन पे वर पाठवले तीन हजार

जितेंद्र नाईकवाडे यांचे नातेवाईक सिद्धार्थ शंभूदेव बागले यांच्या फोन पेवर तीन हजार रुपये पाठवा. तुमचे लोनचे किरकोळ काम राहिले आहे, असे सांगून फोन पेवर दि.१ ऑगस्ट २०२२ रोजी फिर्यादी यांनी पैसे पाठवून दिले. लोनचे काम न करता पुन्हा पैशाची मागणी करत फसवणुक केली.

## एसटीच्या धडकेने तरुण तर खुणेश्वर जवळ वृद्ध ठार

सुराज्य/सोलापूर

वेगाने जाणारी एसटी पाठीमागून धडकल्याने दुचाकी वरील तरुण गंभीर जखमी होऊन मरण पावला. तर दुसऱ्या घटनेत खुणेश्वर जवळ खुणेश्वर येथे जेसीबीच्या धडकेने वृद्ध महिला ठार झाली.

पुणे महामार्गावरील लांबोटी जवळ शनिवारी रात्रीच्या सुमारास झालेल्या अपघातात मयूर शहाजी काशीद (वय २४ रा.खुणेश्वर ता.मोहोळ) याचा मृत्यू झाला. तो शनिवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास सोलापूरहून मोहोळच्या दिशेने दुचाकीवरून निघाला होता. लांबोटी येथील चंदननगर आश्रम शाळेजवळ पाठीमागून एमएच ०९-एफएल-०५५६ या क्रमांकाची एसटी धडकल्याने तो गंभीर जखमी झाला होता. त्याला सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वीच मयत झाला. या अपघाताची प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.



घरा जवळील ड्रेनेजचा खड्डा बुजवण्यासाठी आलेल्या जेसीबीच्या धडकेने ६८ वर्षीय वृद्ध महिला गंभीर जखमी होऊन मरण पावली. हा अपघात खुनेश्वर (ता.मोहोळ) येथे रविवारी दुपारच्या सुमारास घडला. सुमन सुखदेव जगताप (वय ६८ रा.मार्डी ता.उत्तर सोलापूर) असे मयत झालेल्या महिलेचे नाव आहे. त्या आपल्या खुनेश्वर येथे राहणाऱ्या मुलीच्या घरी राहण्यास आल्या होत्या. मुलीच्या घरासमोर ड्रेनेजच्या खड्डा बुजवण्याचे काम जेसीबीने चालू होते. त्यावेळी सुमन जगताप या घरासमोरील कट्ट्यावर बसल्या होत्या.दुपारी ३ वाजता काम संपल्यानंतर जात असताना चालकाच्या हलगर्जीपणामुळे जेसीबीची बकेट त्यांच्या छातीजवळ लागली. त्यावेळी त्या बेशुद्ध झाल्या.त्यांना विलास जगताप (मुलगा) यांनी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले असता त्या उपचारापूर्वी मयत झाल्या. या अपघाताचे प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## डोके आपटून घेतल्याने जखमी

सोलापूर : दारूच्या नशेत आरशावर डोके आपटून घेतले. त्यानंतर फुटलेली काच घेऊन स्वतः हातावर मारून घेतल्याने शारोन हिरालाल शिंदे (वय ३२ रा.हेजनपूर, १४ नंबर शाळेजवळ) हा जखमी झाला. ही घटना रविवारी दुपारच्या सुमारास घडली.

त्याने नशेत घरातील आरशावर डोके आपटून घेतले. त्यानंतर फुटलेल्या काचेने स्वतः डाव्या हाताला मारून घेतले. त्यात तो जखमी झाला.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



**मी पण होणार पैलवान,. पण औषधाशिवाय !**

## फडणवीसांनी प्रोटोकॉल मोडला अन् पवारांचा सन्मान केला

### एकाच गाडीत प्रवास केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या

सुराज्य/पुणे

सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी ऐकून सामान्यजन कधी कधी वैतागून जातात पण जेव्हा राजकारणात एकमेकांना पाण्यात पाहणारे नेते एकत्र आले तर केवळ राजकिय पंडितांच्याच नव्हेतर कॉमन पिपलच्याही भुवया उंचावल्या जातात. रविवारी पुण्यात असाच एक अनोखा प्रसंग पाहायला मिळाला. राज्यात अनेक विषयांवरून ज्याच्यात टीकेची जुगलबंदी होते, ते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ज्येष्ठ नेते तथा राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी एकाच गाडीतून प्रवास केल्याचे पाहून उपस्थितांनी चक्क कपाळावर हात ठेवला.

झाले असे की- काँग्रेसचे दिवंगत नेते पतंगराव कदम यांच्या जयंतीच्या निमित्ताने भारती विद्यापीठात एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.त्याला पवार व फडणवीस हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार होते. कार्यक्रमाला जात असताना पवार-फडणवीसांनी एकत्रित प्रवास करून महाराष्ट्राच्या राजकीय परंपरेचे दर्शन घडवले. देवेंद्र चला माझ्या गाडीतून... असे पवार फडणवीसांना म्हणाले. फडणवीसांनीही प्रोटोकॉल मोडून पवारांच्या गाडीतून काही वेळाकरिता प्रवास केला.

### नेमके काय घडले?

कार्यक्रमाच्या आधी भारती विद्यापीठ परिसरात पवार आणि फडणवीस यांनी पवारांच्या गाडीतून एकत्र प्रवास करत संस्थेची पाहणी केली. मेडिकल कॉलेजचे गेस्ट हाऊस ते लेडीज होस्टेलपर्यंत पवार आणि फडणवीसांनी एकत्रित प्रवास केला. यावेळी गाडीमध्ये मागील सीटवर पवार आणि फडणवीस होते, तर पुढच्या सीटवर शिवाजीराव कदम होते. मेडिकल कॉलेजच्या गेस्ट हाऊसमधून जात असताना चला माझ्यासोबत... असे पवार फडणवीसांना म्हणाले. त्यानंतर फडणवीस पवारांच्या गाडीत बसले. राजकीय गदारोळात पवार आणि फडणवीस यांनी एकाच गाडीतून प्रवास केल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या.

### माझे छोटे बंधू...

काँग्रेस पक्षाच्या एकाही नेत्याला कार्यक्रमाचे निमंत्रण नसल्याने आश्चर्य व्यक्त केले गेले. दुसरीकडे देवेंद्र फडणवीस यांनी विश्वजीत कदम यांचा उल्लेख 'माझे छोटे बंधू' असा केल्याने कार्यक्रमस्थळी एकच चर्चा रंगली.



# पुण्याचे दुर्दैव

राज्यात एकेकाळी सांस्कृतिक व शांततेचे शहर म्हणून ज्या शहराची उभ्या देशात ख्याती होती, त्या पुण्यात स्थानिक तरुणांची दहशत बोकाळत चालली आहे. प्रेमसंबंधातून मुलींची हत्या, तरुणांची आत्महत्या आणि सार्वजनिक ठिकाणी हत्यारे हाती घेऊन होत असलेला राडा अशा घटना नित्याच्याच झाल्या आहेत. पुण्यात काही तरुणांनी कोयता गँग तयार केल्याचे पुणेकर सांगतात. गेल्या काही महिन्यांपासून या गँगने शहरात उच्छाद मांडल्याच्या बातम्या पहायला आणि वाचायलाही मिळत आहेत. अंगावर काळे कपडे घालून तसेच तोंडावर काळे फडके बांधून हे तरुण कोयत्याने हॉटेलांची, मिठाई दुकानांची आणि सार्वजनिक ठिकाणी दुचाकी वाहनांची तोडफोड करत असल्याचे सचित्र दिसत आहे. गेल्याच आठवड्यात असा धुमाकूळ घातलेल्या एका तरुणाचे दोनही पाय पोलिसांनी काठ्या घालून घालून मऊ करून टाकल्याचे साऱ्या राज्याने पाहिले. पोलिसांनी हातात काठ्या घेऊन शहरात गस्त सुरू केली असली तरी या गँगचा धुमाकूळ सुरूच आहे. शुक्रवारी खाऊ गल्लीत या गँगने दहशत माजवल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला. या गँगवर कारवाई करण्यासाठी पुणे पोलिसांनी पोलीस आयुक्त रितेश कुमार यांनी दिलेल्या आदेशानुसार कारवाईसाठी मास्टर प्लॅन तयार केल्याचे सांगण्यात आले. शहरातील अनेक मध्यवर्ती तसेच उपनगरात तरुणांकडून भरदिवसा कोयते उगारले जात आहेत. या तरुणांमध्ये अनेक अल्पवयीन मुलांचा समावेश असल्याने सामान्य नागरिक तसेच व्यापारी दहशतीखाली आहेत. यावर पोलीस कारवाई कधी करणार असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला जात आहे. मुळात ही गँग निर्माण झालीच कशी? तीही एका धारदार शस्त्राच्या नावाखाली. आखातीमधील काही देशांमध्ये धर्माच्या नावावर दहशतवादी संघटना स्थापन झाल्या तर पुण्यासारख्या सुसंस्कृत शहरात एका शस्त्राच्या नावाखाली गँग तयार झाली ही पोलिसांच्या दृष्टीने लाजिरवाणी बाब म्हणावी लागेल. आज कोयता झाला. उद्या तलवार आणि कुऱ्हाड गँग तयार झाली तर पोलीस दल हात बांधून बसणार आहे काय? मुळात ही गँग तयार होत असताना त्याची खबर पोलिसांना कशी काय लागली नाही? सार्वजनिक



ठिकाणी एखाद्या माणसाजवळ शस्त्र आढळले तर त्याला अटक होते. आत डांबले जाते. इथे तर दिवसाढवळ्या हातात शस्त्रे घेऊन नंगानाच करत असताना पोलीस गप्प कसे? कुणीही कायदा हाता घेऊ नये, असे सांगितले जाते ते योग्य आहे. सर्वसामान्यांना कायदा दाखवला जातो. इथेतर शस्त्रे घेऊन दहशत माजवत आहेत. त्यांना काहीच होत नाही. असली ही विषमता घटनेला कदापिही मान्य नाही. मध्यंतरी हडपसर परिसरात नंग्या तलवारी घेऊन काही गुंड रस्त्यावर फिरले. दुचाकी वाहनधारकांना अडवून खंडणी वसूल केली गेली. या गुंडांच्या विरोधात नागरिकांनी मोर्चा काढला. अजून एक गँग तयार होईपर्यंत पोलीस डोळे झाकून बसणार आहेत काय? कोयता गँग कशी तयार झाली? त्यामागे कोण आहेत? त्यांचे काळे कपडे पाहता कोणती दहशतवादी संघटनांचा त्यांना छुपे बळ आहे काय? याचा शोध पोलिसांना घ्यावाच लागेल. आताच अशा गँगची पाळेमुळे नष्ट करायला हवीत अन्यथा ही मुळे सर्वदूर पसरली तर पुण्यात तर अशांतता माजेलच शिवाय अशा गँगचे लोण राज्यात सर्वत्र पसरू शकते. काळ सोकावू देता कामा नये. जर काळ सोकावला तर सोकावलेल्या व्यक्तींपासून समाजाला आणि विशेष करून पोलिसांना कसा त्रास होतो याविषयीची कित्येक उदाहरणे देता येतील. दुर्लक्ष केल्यामुळे पुण्यात या गँगचा काळ सोकावलेला आहे. गुन्हेगारी वाढत असताना ती नियंत्रित करण्यासाठी मोक्का आणि सराईत गुन्हेगारांविरोधात कठोर कारवाई करणार असल्याची माहिती पोलीस आयुक्तांनी दिली पण प्रत्यक्षात कृतीच दिसत नाही. पोलिसांनी ज्या इसमाला काठ्या घातल्या, त्या ॲक्शनचे सर्वत्र स्वागत झाले. हातात काठ्या असताना पुन्हा मास्टर प्लॅन कशाला? एकीकडे पोलीस दल शांत असताना दुसरीकडे सत्ताधारी व विरोधक हाताची घडी घालून बसावेत, किती ही शोकांतिका? उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृहखाते असताना ते गप्प का बसले आहेत? असा पुणेकरांचा संतापजनक सवाल आहे. एरव्ही पुण्याविषयी पुळका दाखवणारे बारामतीकर मौन का बाळगून आहेत? एरव्ही पुतळ्याची तोडफोड करून मर्दुमकी दाखवणारे ब्रिगेड मंडळी का डोळे झाकून आहेत? सुसंस्कृत पुण्याची ओळख आता 'गुन्हेगारीचे पुणे' म्हणून होऊ लागली आहे. याची चिंता कुणालाही वाटू नये हे पुण्याचे दुर्दैव म्हणावे लागेल.

## राजकीय

**महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपूर येथे पार पडले. दोन आठवडे कामकाज झाले. महाआघाडी विरुद्ध मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असा सामना रोज बघायला मिळाला. सत्ता गेल्यामुळे महाआघाडीला विशेषत: उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाला नैराश्याने पछाडले आहे. उद्धव ठाकरे यांनीही नागपुरात येऊन शिंदे यांना आपल्या हल्ल्याचे टार्गेट बनविण्याचा प्रयत्न केला. आपल्याला हटवून मुख्यमंत्रिपदाचे सिंहासन शिंदे यांनी काबीज केले याचा त्यांना राग आहेच, पण अपक्ष समर्थकांसह पन्नास आमदार व तेरा खासदार शिंदे गटात गेल्याने पक्ष एकदमच कमकुवत झालाय. महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नापासून ते नागपूर न्यासाच्या भूखंडापर्यंत त्यांनी व विरोधी बाकांवरील आमदारांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर सुसाट आरोप केले. शिंदे यांनी ८३ कोटी रुपयांचे भूखंड २ कोटींत बिल्डर्सला विकले म्हणजे केवढा भयंकर घोटाळा केला, असे चित्र निर्माण केले. पण पुढे काहीच घडले नाही. शिंदे आणि फडणवीस यांची जोडी संपूर्ण अधिवेशनात महाआघाडीला भारी ठरली. एक तर शिंदे-फडणवीसांकडे भक्कम बहुमत आहेच, पण या दोन्ही नेत्यांकडे जबर आत्मविश्वासही आहे.**

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर नागपूरला झालेले हे दुसरे हिवाळी अधिवेशन. मध्यंतरी दोन वर्षे कोरोनामुळे नागपूरला अधिवेशन झालेच नाही. विदर्भ महाराष्ट्रात सामील झाल्यापासून नागपूर करारानुसार दरवर्षी हिवाळ्यात विधिमंडळाचे अधिवेशन घेणे हे सरकारवर बंधनकारक आहे. किमान चार आठवडे अधिवेशन झाले पाहिजे, असे अपेक्षित असते. दोन वर्षांनी अधिवेशन यंदा झाले, पण तेही दहा दिवसांचे. या अधिवेशनाने विदर्भाला काय दिले? विदर्भाच्या प्रश्नावर किती चर्चा झाली? अधिवेशनाने विदर्भातील जनता समाधानी आहे का? या प्रश्नांवर नकारार्थी प्रतिक्रिया उमटल्या आहेत. महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न, अभिनेता सुशांत सिंह आणि दिशा सालियनचा मृत्यू, महाघाडीने शिंदे सरकारवर केलेले घोटाळ्याचे आरोप, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जयंत पाटील यांच्यावर झालेली निलंबनाची कारवाई, धर्मवीर नव्हे स्वराज्यरक्षक असे अजित पवारांनी केलेले वक्तव्य आणि अधिवेशन संपता विधानसभा अध्यक्षांवर आणलेला अविश्वासाचा प्रस्ताव याभोवतीच अधिवेशन फिरताना दिसले. मुंबई केंद्रशासित करण्याचा भाजपचा डाव आहे, अशी नेहमीची आवई शिवसेना उ.बा.ठा.ने उठवली, पण त्यातून काही निष्पन्न झाले नाही.

सन १९९१ मध्ये छगन भुजबळांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत फूट पडली नागपूरला. मनोहर जोशी यांनी विरोधी पक्ष नेतेपद गमावल्यावर ते रिक्षाने घरी गेले नागपूरलाच.

# जोडी 'लय भारी'

१९८१ मध्ये काँग्रेसचे मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांच्याविरोधात पक्षाच्या आमदारांनी बंडांचा झेंडा फडकवला नागपूर अधिवेशनातच. पाटबंधारे खात्यातून भ्रष्टाचाराचे पाट वाहत आहेत, अशी धारदार टीका आपल्याच सरकारवर करण्याचे धाडस विलासराव देशमुखांनी दाखवले नागपूर अधिवेशनातच. नागपूर अधिवेशन राजकीय उलथापालथींनी नेहमीचीच गाजत असते. म्हणूनच एकनाथ शिंदे यांना कोंडीत पकडण्यासाठी महाआघाडीने नागपूर अधिवेशनात बरेच प्रयत्न करून पाहिले. नागपूर अधिवेशनाच्या तोंडावरच भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपल्या कारकिर्दीतच देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्री झाल्याचे बघायचे आहे, अशी इच्छा व्यक्त केली. सध्या तरी मुख्यमंत्रिपदासाठी व्हेकन्सी नसताना त्यांनी असे बोलण्याचे धाडस का करावे? मुख्यमंत्री शिंदे यांच्यावर नागपूर सुधार प्रन्यास भूखंडावरून उद्धव गटाने नेम धरला. पण हा प्रश्न मुळात कोणी विचारला होता? उद्धव गटाला शिंदेंवर हल्ला करायला आयते हत्यार मिळाले.

एकनाथ शिंदे व त्यांच्या पक्षातील अब्दुल सत्तार, संजय राठोड, उदय सामंत, शंभूराज देसाई या मंत्र्यांना महाआघाडीने टार्गेट केले. भाजपच्या कोणत्याही मंत्र्यावर उद्धव गटाने संशयही व्यक्त केला नाही. जेव्हा शिंदे गटाचे मंत्री ठाकरे सरकारमध्ये होते, तेव्हा ते स्वच्छ, सक्षम, कट्टर शिवसैनिक होते. त्यांनी उठाव करून भाजपबरोबर सरकार स्थापन केले व मंत्रिपद घेतल्यावर ते एकदम भ्रष्ट कसे झाले?

नागपुरात समृद्धी मार्गाचे उद्घाटन झाले, तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना स्वत:च्या जवळ ओढून त्यांना चांगल्या कामाबद्दल शाबासकी दिली. तसेच अधिवेशन चालू असताना दिल्लीत झालेल्या बाल शौर्य दिनाला पंतप्रधानांनी देशाच्या दोन मुख्यमंत्र्यांना आमंत्रण दिले होते, त्यात एक शिंदे होते. शिंदे यांची मोदी, शहा व नड्डा यांच्याशी जवळीक वाढत आहे, असा संदेश महाराष्ट्राच्या राजकारणात सर्वत्र गेला आहे. त्याचा राग उद्धव ठाकरे यांना असावा. शिंदे व फडणवीस सरकार टिकणार नाही, असे भाकीत



उद्धव गटाच्या प्रवक्त्यांनी अनेकदा केले आहे. बघता बघता सहा महिने झाले. मुंबई, नागपूरचे अधिवेशनही व्यवस्थित पार पडले. दुसरीकडे शिवसेना हे पक्षाचे नाव, निवडणूक चिन्ह गोठवले गेले आहे. मुंबई महापालिकेतील पक्ष कार्यालयही सील केले आहे. अशी चोहोबाजूंनी होणारी कोंडी वाढत चालली आहे. म्हणूनच उबाठा शिवसेना अस्वस्थ आहे.

एकनाथ शिंदे यांच्या भाषणांमध्ये दिवसेंदिवस आक्रमकता वाढू लागली आहे. विशेषत: उद्धव ठाकरेंकडून जे आरोप केले जातात, त्यांना सडेतोड ते उत्तर देतात. शिंदे यांचा नागपूर अधिवेशनात आवेश जबरदस्त होता. ठाकरेंवर शिंदेंनी घणाघाती केलेले प्रहार' हे अचूक होतेच, पण त्यामागे मुख्यमंत्रिपदाचा जबर आत्मविश्वासही होता.

'मी शांत आहे, हतबल नाही. पुढील अडीच वर्षे झेंडा व अजेंडा आमचाच असेल. नंतरही आम्हीच येणार. तोंड आहे म्हणून मी काहीही बोलत नाही. हेलिकॉप्टरने शेतावर गेलो म्हणून मला हिणवले, मग मलाही बोलावे लागेल, अडीच वर्षे लोकांना न भेटणारा मुख्यमंत्री राज्याने पाहिला आम्ही देना बँक आहोत, लेना बँक नाही.'

प्रबोधनकारांचे वारस, असे सांगणारे जेव्हा वर्षा बंगल्यातून गेले, तेव्हा घमेलीभर लिंबे सापडली. आम्ही रेशीम बागेत गेलो म्हणून टीका करता, तुम्ही गोविंद बागेत जाता, त्याचे काय? आमची हिम्मत काढता व तुम्ही स्वत: घरात बसता, आम्ही बोलायचे ठरवले ना, तर तुमती सगळी अंडी-पिल्ली आम्हांला माहिती आहेत, 'तुम लढो, हम कपडे संभालेंगे', असे बाळासाहेब नव्हते. आमच्यावर टीका करणारे स्वत:च बाळासाहेबांना अटक करणाऱ्यांच्या मांडीला मांडी लावून बसले होते. त्यांच्या सरकारमधील गृहमंत्री तुरुंगात होते, दुसरे मंत्री दाऊदशी संबंध म्हणून तुरुंगात गेले. त्यांचा मंत्रिपदाचा राजीनामा का घेतला नाही? हिम्मत असेल तर सुरज परमारच्या मृत्यूची चौकशीची मागणी करा, त्यात कोण कोण येईल याची कल्पनाच करवत नाही.

प्रबोधनकारांनी कर्मकांडावर सातत्याने प्रहार' केले, अंधश्रद्धा व अनिष्ट चालीरीतींच्या विरुद्ध लढले. त्याच प्रबोधनकारांचे वारस, लिंबू फिरविण्याची भाषा करू लागले आहेत, हिऱ्याच्या पोटी निपजली गारगोटी... असा हा प्रकार आहे.

एकनाथ शिंदे यांची टोलेबाजी थेट मातोश्रीलाच आव्हान देणारी होती. दिशा सालियन मृत्यू प्रकरणातही विरोधी पक्ष तोंडावर आपटला. तिच्या मृत्यूची चौकशी आम्ही केलेली नाही, असे सीबीआयने स्पष्ट केल्याने सीबीआयने क्लीनचिट दिली, असे म्हणणाऱ्यांची तोंडे बंद झाली. सुशांतचे पोस्टमार्टेम कोणाच्या दबावाखाली केले, या नितेश राणेंच्या प्रश्नानेही विरोधी बाकांवर बसलेल्यांचा अचूक वेध घेतला.

ठाकरे सरकारच्या काळात केंद्रीय मंत्री नारायण राणे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नितेश राणे, निलेश राणे, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, गिरीश महाजन यांना त्रास देण्याचा व पोलिसांकरवी अडकविण्याचा कसा प्रयत्न झाला, हे उभ्या महाराष्ट्राने बघितले. फडणवीस यांनीही आपल्याला संपविण्यासाठी तत्कालीन पोलीस आयुक्तांवर जबाबदारी सोपवली होती, असा त्या वेळच्या ठाकरे सरकारवर थेट घणाघात केला. तेंव्हा महाआघाडीच्या नेत्यांची अवस्था अवघडल्यासारखी झाली. अधिवेशनात महाघाडीची एकजूट दिसली नाहीच, पण शिंदे-फडणवीस ही 'जोडी लय भारी' ठरली!

**- सुकृत खांडेकर.**

## टुडेज ब्लॉग

# हुकूमशाहीविरोधात लढणारा पत्रकार

**सध्या देशात इतिहासातील अनेक लढे हे धार्मिक चष्म्यातून बघण्याचा ट्रेंडच निघाला आहे. माध्यमातूनही इतिहास तसाच दाखवला जातो. असाच एक स्वातंत्र्याचा लढा 'हैदराबाद मुक्तिसंग्राम' हा धार्मिक चष्म्यातून नेहमीच पाहत आलो आहोत. हैदराबाद मुक्तसंग्राम लढा हा प्रथमदर्शनी जरी हिंदू आणि मुस्लीम यांच्यातील संघर्ष वाटत असला तरी वास्तविकता तशी नव्हती. याच निजाम सरकारच्या हुकुशाहीविरोधात एका मुस्लीम पत्रकाराने आवाज उठवल्यामुळे त्याचे हात कलम करून हत्या करण्यात आली होती. त्या पत्रकाराचे नाव हुतात्मा शोएब उल्ला खान होते.**

हैदराबाद संस्थानात रझाकार संघटनेचे लोक हिंदूंचा छळ तर करीत असत. परंतु संस्थानात जे चालले होते ते सर्वच मुस्लीम लोकांना पसंद होते असे नव्हे, त्यांच्याविरोधात बोलणाऱ्या मुसलमानांनाही ते तितक्यात क्रूरपणे वागवीत असत. निजामाच्या एकतंत्री कारभारास व रझाकारांच्या अन्यायाला जाहीरपणे विरोध करणाऱ्यांमध्ये 'इमरोज' या उर्दू वर्तमानपत्राचा तरुण संपादक शोएब उल्ला खान यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते.



शोएब उल्ला खान हे पुरोगामी विचारांचे तरुण संपादक होते. ते आपल्या दैनिकातून धर्मांध प्रवृत्तीवर कडाडून टीका करीत असत. तसेच निजाम आणि रझाकारांचे दडपशाहीचे धोरण त्यांना मान्य नव्हते. एकदा शोएब उल्ला खान यांनी आपल्या दैनिकात निजाम सरकारवर 'दिन की सरकार और रात की सरकार' असा लेख लिहून प्रखर टीका केली होती. तेव्हा कासीम रिझवी चिडून रझाकारांच्या मेळाव्यासमोर बोलताना असे विधान केले की, निजाम साहेबांविरोधात लिहिण्याची हिंमत करणाऱ्यांचे हात कलम करायला हवेत.

कासीम रिझवीच्या भाषणामुळे रझाकारकडून 'इमरोज' चा गळा दाबण्यासाठी कट रचण्यात आला. २० ऑगस्ट १९४८ ला धमकी देणारे एक पात्र शोएबला मिळाले. त्यात असे लिहिले होते की, ''आपल्या लेखणीला आवरा अन्यथा मरणाला तयार राहा'' परंतु शोएब उल्लाह खानने या धमकीला भीक घातली नाही. इमरोजला आपल्या उद्देशांपासून ढळू दिले नाही.

२१ ऑगस्टच्या रात्री एक वाजता शोएब आणि त्याचा मेहुणा प्रेसमधून घरी जाण्यास निघाले. त्यांच्या मागून पाच-सहा रझाकार गुंडांची टोळी आली, त्यांनी समोर येऊन आदाब अर्ज केला आणि विचारले इकडून तीन-चार रझाकार लोकांना पळत जात असल्याचे आपण बघितले आहे का? शोएब म्हणाले नाही. पण भानगड काय आहे? हे शब्द उच्चारतो न उच्चारतो तोच एकाने शोएबच्या हातावर तलवारीचा वर केला. हात शरीरापासून वेगळा झाला. मागून मोईन खान या रझाकाराने त्याच्या पाठीवर गोळ्या झाडल्या. तोच शोएबचा मेहुणा महंमद इस्माईल खानने शोएबला खाली पडण्यापासून वाचविण्याचा प्रयत्न करीत असताना त्याच्याही हातावर वार करण्यात आले. त्याचाही हात शरीरापासून वेगळा झाला. गोंधळ ऐकून लोक घटनास्थळी जमले. लोकांना पाहून रझाकार पळून गेले. त्याच अवस्थेत शोएबला त्यांच्या घरी घेऊन जाण्यात आले, थोड्याच वेळात शोएबने सर्वांसमक्ष आपले प्राण सोडले.

पत्रकार शोएब उल्ला खानच्या मृत्यूची बातमी पंडित जवाहरलाल नेहरूंना समजताच ते दु:खी झाले. त्यांना या गोष्टीची जाणीव झाली की, हैदराबादमध्ये खरोखरच अराजकता माजली आहे. या घटनेनंतर त्यांनी सरदार वल्लभभाई पटेलांसमोर हैदराबादच्या बाबतीत चिंता व्यक्त केली होती. शोएब उल्ला खानच्या बलिदानानंतर अवघ्या २३ दिवसानंतर पोलीस ॲक्शनची कारवाई सुरु झाली. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले.

तेलंगणा आणि मराठवाड्यामध्ये यावर्षी हैदराबाद मुक्तिसंग्रामाला ७५ वर्षे पूर्ण झाले म्हणून अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरा केला जात आहे. अमृत महोत्सवी वर्षात हुतात्मा शोएब उल्ला खानच्या बलिदानाचा गौरव झालाच पाहिजे म्हणून वरील माहिती देण्याचा एवढाच प्रयत्न आहे.

**- जयपाल गायकवाड.**

## जन्म हा अखेरचा

# धर्माचारस्थल - ६



जेंव्हा सर्व भूतांत आत्मरुप दिसू लागते, तेंव्हा सारे भेद मावळून जातात. मग कोणाबद्दल मनात द्वेष राहत नाही की कोणाबद्दल राग राहत नाही. सर्व जीवात्म्यांना आत्मरुप मानणारी भावना दृढ झाली तर आपल्या हातून कुणालाही इजा पोहोचत नाही आणि कुणाचेही अकल्याण होत नाही. सर्व भूतांत आत्मरुप पाहणे हेच ज्ञान होय.

**एक एव शिव: साक्षाज्जगदेतदिति स्फुटम् ।**
**पश्यत: किं न जायेत ममकारो हि विभ्रम: ।।१६.६३।।**

प्रपंच निर्मितीपूर्वी एकमेव ब्रह्म होते. पुढे 'एक'च अनेक झाले. म्हणून अनेकांत आपण एकालाच पाहिले पाहिजे. हे सर्व विश्व म्हणजे साक्षात् शिवच आहे, अशी भावना दृढ करायला हवी. जो या दृष्टीने प्रपंचाकडे पाहतो, त्याच्या मनात विशिष्ट वस्तूबद्दल ममत्व असत नाही.

**धर्म एव समस्तानां यत: संसिद्धिकारणम् ।**
**निस्पृहोऽपि महायोगी धर्ममार्गं च न त्यजेत ।।**

ज्याला सांसारिक गोष्टींशी काही देणे-घेणे नसते, अशा अत्यंत नि:स्पृह माणसाने धर्माचरण करण्याची जरुरी आहे काय? असा प्रश्न कोणी उपस्थित केला तर त्याचे येथे उत्तर दिले आहे. माणसाला भोग आणि मोक्ष दोन्ही हवे असतात. इहलोकांत असताना त्याला सुखोपभोग हवे असतात तर परलोकात जाताना त्याला सद्गतीची अपेक्षा असते.

**(क्रमश:) - काशी जगद्गुरु**
**डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

# गोर-गरिबांचा आधारवड

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री आणि महाराष्ट्राचे राजकीय व शैक्षणिक क्षेत्र स्वकर्तृत्वाने व्यापून टाकणारे, लाखोंचे पोशिंदे, दिलदार आणि कायम हसतमुख असणारे डॉ. पतंगराव कदम यांचा ९ मार्च हा पाचवा स्मृतिदिन.



सांगली जिल्ह्यातील सोनसळ येथे एका गरीब, शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या आणि प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतलेल्या डॉ. पतंगराव कदम हे एक साधा शिक्षक ते स्वतः स्थापन केलेल्या विद्यापीठाचे कुलपती अशी अशक्यप्राय मजल मारली. त्यांनी उभ्या केलेल्या संस्थांच्या परिसरस्पर्शाने कष्टकरी कुटुंबातील हजारो मुलांना शिक्षणाचा प्रकाश मिळाला आणि कित्येक पिढ्या ज्यांचे राहणीमान बदलले नाही, अशा लाखो कुटुंबांचे राहणीमान बदलले. वयाच्या १९ व्या वर्षी त्यांनी पुण्यासारख्या विद्यानगरीत खिशात केवळ १२८ रुपये असताना विद्यापीठ स्थापनेचे स्वप्न पाहून ते दुर्दम्य आशावाद आणि जिद्दीच्या भांडवलावर प्रत्यक्षात साकार केले. त्यांनी स्थापन केलेल्या भारती विद्यापीठात आज लक्षावधी मुले शिकताहेत, तेवढीच शिकली तर सुमारे १५ ते २० हजार शिक्षक, प्राध्यापक, डॉक्टर्स सेवेत आहेत. इतका प्रचंड कामाचा व्याप असतानाही त्यांनी शिक्षणाबरोबरच राजकारण आणि समाजकारण करीत उद्योग, व्यापार, शेती, सहकार, बँकिंग, आरोग्यसेवा आदी क्षेत्रात भरीव योगदान दिले. विद्यापीठाचे कुलपती, अनेक सहकारी संस्थांचे संस्थापक, राज्य मंत्रीमंडळात विविध खात्यांचे मंत्री असे बहुआयामी व्यक्तिमत्व असणाऱ्या डॉ. पतंगराव कदम यांनी माणसे उभी केली आणि कोसळणाऱ्या माणसांचेही आधारवड झाले. त्यांच्यासारखी माणसे क्वचित जन्माला येतात आणि आपली छाप ठेवून जातात. त्यांनी उभारलेली ज्ञानमंदिरे आणि सहकारी संस्था त्यांच्या कार्याची प्रेरणा देत राहतील. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या शैक्षणिक आणि सहकार क्षेत्राचे मोठे नुकसान झाले आहे. सोनसळच्या या कर्मयोगी सोनहिऱ्याला विनम्र आदरांजली.

**- प्रा. विजय कोष्टी, कवठे महांकाळ (सांगली).**

# माणुसकी नसलेला समाज

पत्रकार दिन दरवर्षी साजरा होतो. यानिमित्ताने पुरस्कार जाहीर झाले, पत्रकारांचे सत्कार झाले. जगभरात जे काही घडत असते, त्याचे वृत्तांकन पत्रकार करीत असतात. हे कार्य सोपे नाही व परिस्थिती पूर्वीसारखी नसल्याने त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. विशेषतः संवेदनशील विषयांवर लिहिणे सोपे नाही. चुकीच्या गोष्टींना विरोध केल्यास धमक्या येतात तसेच काही पत्रकारांना जीव गमवावा लागल्याची प्रकरणे घडतात. तरीही पत्रकार बंधूभगिनी आपले कार्य धाडसाने करीत असतात.

**- प्रफुल्लचंद्र काळे, नाशिक.**

# जैसी करनी, वैसी भरनी...

पाकिस्तान म्हंटले की जगापुढे येतो तो दहशतवाद. पाकिस्तानचे दुसरे नावच दहशतवाद आहे असे म्हंटले तरी वावगे ठरणार नाही. कारण आजवर पाकिस्तानने एकच काम केले आहे ते म्हणजे दहशतवाद वाढवणे, दहशतवाद्यांना आर्थिक मदत पुरवणे, पाकव्याप्त काश्मीरमध्ये दहशतवादी तळे स्थापन करणे, त्यांना लष्करी मदत पुरवणे हेच काम पाकिस्तान आजवर करत आला आहे. म्हणूनच पाकिस्तानला 'दहशतवादाची फॅक्टरी' असे म्हटले जाते. बरं ही फॅक्टरी कोणासाठी काढली तर भारतासाठी. भारतासोबत समोरासमोर युद्ध झाल्यास टिकाव लागणार नाही हे माहीत असल्याने दहशतवाद पसरवून भारताला अस्थिर करण्याचा प्रयत्न केला बरे. इतके करूनही पाकिस्तान भारताला अस्थिर करू शकला का? तर नाही. उलट भारत आज जगातील प्रगतशील राष्ट्र म्हणून ओळखले जाते.

जग भारताकडे भावी महासत्ता म्हणून पाहते तर पाकिस्तानकडे दहशतवादी राष्ट्र म्हणून पाहत आहे. म्हणतात ना जो दुसऱ्यासाठी खड्डा खणतो, तोच त्यात आधी गाडला जातो. पाकिस्तानने भारताविरोधात जो दहशतवादाचा भस्मासुर उभा केला ना आता तोच दहशतवादाचा भस्मासुर पाकिस्तानलाच भस्म करायला निघाला आहे. हो हे खरे आहे. जगासमोर दहशतवादाचे संकट उभे करणाऱ्या पाकिस्तानसमोरच आता दहशतवादाचे संकट उभे राहिले आहे. पाकिस्तानात दहशतवादी घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. अफगाणिस्तान सीमेवर दहशतवादी घटनांमध्ये अलिकडे खूप वाढ झाली असून ही वाढ अफगाणिस्तान सीमेवरील दहशतवाद पाकिस्तानसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. पाकिस्तानात बंदी असलेल्या तेहरिक-ए -पाकिस्तान तालिबान (TTP) या दहशतवादी संघटनेचा यामागे हात असल्याचे बोलले जाते. या संघटनेसोबत पाकिस्तानची असलेली शस्त्रसंधी नोव्हेंबरमध्ये संपुष्टात आली. तेंव्हापासून तिथे मोठ्या प्रमाणात दहशतवादी हल्ले वाढले आहेत. या संघटनेने नोव्हेंबरमध्ये पाकिस्तानात १०० हून अधिक हल्ले केले आहेत तर डिसेंबरमध्ये ६० हून अधिक हल्ले केले आहेत. या हल्ल्यात दोन हजारांहून अधिक पाकिस्तानी सुरक्षा रक्षकांचा मृत्यू झाला आहे. या संघटनेची ताकद इतकी वाढली आहे की त्यांनी थेट पाकिस्तानी सरकारलाच आव्हान दिले आहे. त्यामुळे पाकिस्तानचे पंतप्रधान शहाबाज शरीफ आणि त्यांच्या सरकारचे चांगलेच धाबे दणाणले आहेत. अफगाणिस्तान सीमेवरील वजरीस्थान आणि स्वात या दोन प्रांतात त्यांनी स्वतःचे शासन स्थापन केले असून तिथे कट्टर इस्लामिक राजवट सुरू केली आहे. या संघटनेला तालिबानचा पाठिंबा असून या संघटनेमार्फतच तालिबान पाकिस्तानवर कब्जा करण्याच्या प्रयत्नात आहे. वास्तविक जेंव्हा सर्व जग तालिबानला विरोध करत होते तेंव्हा हाच पाकिस्तान तालिबानने समर्थन करत होता. अफगाणिस्तानात जेंव्हा तालिबानी राजवट सुरू झाली तेंव्हा तालिबानला मान्यता देणारा पाकिस्तान हाच पहिला देश होता. तालिबानला मान्यता देण्यामागे पाकिस्तानचा मनोदय असा होता की तालिबानला समर्थन दिल्याने तालिबान भारतात दहशतवादी हल्ले करेल पण झाले उलटेच. तालिबान भारतात नव्हे तर पाकिस्तानातच दहशतवादी हल्ले करत आहे. तेहरिक-ए-पाकिस्तान तालिबान ही दहशतवादी संघटना पाकिस्तानचे आणखी तुकडे करतील असा कयास अनेक तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. दहशतवाद्यांच्या मदतीने भारताचे तुकडे पाहण्याची स्वप्ने पाहणाऱ्या पाकिस्तानचेच आता तुकडे पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भारताविरोधात वापरलेले दहशतवादाचे शस्त्र आता पाकिस्तानवरच बुमरंग झाले आहे. यालाच म्हणतात 'जैसी करनी, वैसी भरनी'

**- श्याम ठाणेदार, दौंड, पुणे.**



सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

### लोकमंगल साहित्य पुरस्काराचा वितरण सोहळा

# लोकमंगलने साहित्य पुरस्काराचे पावित्र्य जपले : अविनाश सप्रे

सुराज्य/सोलापूर

आज पुरस्कार बोकाळलेले आहेत. साहित्यिकांना पुरस्कार दिला की संशय घेतला जातो मात्र लोकमंगलने पुरस्काराचे पावित्र्य जपले आहे. आत्तापर्यंत त्यांनी दिलेले सर्व पुरस्कार गुणवत्तापूर्णच राहिले आहेत असे प्रतिपादन समीक्षक अविनाश सप्रे यांनी केले.



लोकमंगल साहित्य पुरस्कार चे वितरण रविवारी सायंकाळी सहा वाजता हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या किर्लोस्कर सभागृहामध्ये पार पडले. यावेळी ते बोलत होते.

२०२२ चे राज्यस्तरीय लोकमंगल साहित्य पुरस्कार नांदेड येथील विजय पाडळकर लिखित 'तो उंच माणूस, मुंबई येथील डॉ. बाळ फोंडके लिखित ' ऋणानुबंध ' बुलढाणा येथील रमेश इंगळे लिखित 'एका कादंबरीची गोष्ट ' साहित्य क्षेत्रातील लक्षणीय कार्यासाठीचा पुरस्कार - मुंबईतील संशोधक डॉ. मोहम्मद आझम, सोलापूर साहित्य पुरस्कार हा कुर्डूवाडी येथील राजेंद्र दास यांच्या 'तुकोबा' या साहित्याला प्रदान करण्यात आला. २५ हजार रुपये, स्मृती चिन्ह, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप होते. यापुरस्कारावेळी डॉ. बाळ फोंडके राहू शकले नाहीत.

पुरस्कार वितरण ज्येष्ठ समीक्षक अविनाश सप्रे, सिनेकलावंत मृणाल कुलकर्णी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर पुरस्कार प्राप्त व्यक्ती, आमदार सुभाष देशमुख, पुरस्कार समितीचे अध्यक्ष रोहन देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. आज सर्व क्षेत्रातील पर्यावरण गढूळ झाले आह. त्यात टाकण्याचे काम साहित्यिक करत आहेत हे समाधान आहे. समाजात असणाऱ्या या साहित्यिकांकडून सकारात्मकता घ्यावी असे प्रतिपादन सिने अभिनेत्री मृणाल देव यांनी केले.

यावेळी सर्व सत्कारमूर्तींनी मनोगत व्यक्त केले. आमदार सुभाष देशमुख म्हणाले कि सोलापूरकर हे रसिक आहेत त्यांना साहित्यिकाची भूक आहे.

त्यामुळे त्यांना साहित्याची मेजवानी मिळावी आणि त्यांच्यावर बौद्धिक संस्कार व्हावे म्हणून लोकमंगलने या पुरस्काराचे सुरुवात केली आह.

प्रारंभी सरस्वती पूजन करण्यात आले. शोभा बोल्ली यांनी प्रास्ताविक केले. यावेळी नितीन वैद्य, ऋचा कांबळे, शिरीष देखणे, दत्ता घोलप, रणधीर शिंदे या परीक्षकांचा सत्कार करण्यात आला. या नंतर पुरस्कार प्राप्त व्यक्तींचा परिचय करून पुरस्कार प्रदान करण्यात आले. सूत्रसंचालन ममता बोल्ली यांनी केले.

## विवाहितेचा जाळून खून: पती सासू आणि सासरे निर्दोष मुक्त

सुराज्य/सोलापूर

हुंड्याच्या कारणावरून विवाहितेच्या अंगावर रॉकेल ओतून पेटवून खून केल्याच्या आरोपातून मयताच्या पतीसह तिघांना गुन्हा शाबीत न झाल्यामुळे निर्दोष मुक्त करण्याचा आदेश अतिरिक्त सत्रन्यायाधीश आर.डी. खेडेकर यांनी नुकताच दिला आहे.

व्यंकटेश शंकर कोंबेकर (पती), तुळसाबाई कोंबेकर (सासू) आणि सासरे शिवराम ऊर्फ शंकर नरसय्या कोंबेकर (सर्व रा.८७ जगजीवनराम झोपडपट्टी, सोलापूर) अशी निर्दोष मुक्त झालेल्या आरोपींची नावे आहेत. या तिघांनी मिळून अनुराधा व्यंकटेश कोंबेकर हिचा सोने आणि पैशासाठी छळ करून दि.१२ एप्रिल २०१८ रोजी तिच्या अंगावर रॉकेल ओतून पेटवून तिचा खून केला, असे सरकार पक्षाचे म्हणणे होते.

या खटल्याची थोडक्यात हकिकत अशी, व्यंकटेश कोंबेकर याचा विवाह २०१२ साली अनुराधा हिच्याबरोबर झाला होता. लग्नानंतर पती, सासू, सासरा यांनी सोने व पैसे या कारणावरून अनुराधा हिचा छळ सुरू केला.

त्याबाबत तिने न्यायालयात खटला दाखल केली होता. दरम्यान आरोपींनी नांदावयास घेऊन गेले होते. नांदण्यास घेऊन गेल्यानंतर पुन्हा आरोपींनी संगनमताने तिला छळ सुरू केला.आणि घटनेच्या दिवशी



म्हणजेच १२ एप्रिल२०१८ रोजी तिला त्याच कारणावरून तिघांनी तिच्या अंगावर रॉकेल ओतून पेटवून दिले होते. उपचारा दरम्यान अनुराधा ही रुग्णालयात मरण पावली.

तिघांनी मिळून हुंड्याच्या कारणावरून आपल्या मुलीचा जाळून खून केला, अशा आशयाची फिर्याद अनुराधाच्या वडिलांनी सदर बझार पोलिसात दाखल केली होती.

त्याप्रमाणे पोलिसांनी तिघांवर गुन्हा दाखल केला होता. या खटल्यात सरकार पक्षातर्फे एकूण १२ साक्षीदार तपासण्यात आले. त्यात समाजातील पंच, नेत्र साक्षीदार, नातेवाईक, मृत्युपूर्व जबाब नोंदविणारे पोलीस अधिकारी, डॉक्टर इत्यादींच्या महत्त्वपूर्ण साक्षी झाल्या. या प्रकरणात आरोपींच्या वकिलांनी सदरची घटना ही अपघात किंवा आत्महत्या असावी, आरोपींने मयताला वाचविण्याचा प्रयत्न केला आहे, मृत्युपूर्व जबाब विश्वासार्ह नाही, साक्षीदारांच्या साक्षीमध्ये विसंगती, खोटेपणा दिसतो, पोलिसांनी या प्रकरणात लहान मुलगा अनिकेत याची साक्ष का नोंदविली नाही? या आणि अशा इतर महत्त्वाच्या बाबींवरती युक्तिवाद मांडला होता. शिवाय काही महत्त्वाचे उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे निवाडे सादर केले होते.

सरकार पक्षाने युक्तिवाद करून गुन्हा सिद्ध होत असल्याने त्यांना दोषी धरावे आणि शिक्षा करावी, अशी मागणी केली. मात्र न्यायालयाने आरोपींच्या वकिलांनी मांडलेला युक्तिवाद ग्राह्य सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली.

या खटल्यात आरोपी तर्फे अॅड. शशी कुलकर्णी, अॅड. स्वप्निल सरवदे, अॅड. रणजीत चौधरी, अॅड. आशुतोष पुरवंत, सरकार तर्फे अॅड. पी.एस. जन्नू, तर मूळ फिर्यादीतर्फे अॅड. इस्माईल शेख यांनी काम पाहिले.



## गोवा येथे झालेल्या राष्ट्रीय कराटे स्पर्धेत श्रीपूरच्या विद्यार्थ्यांचे यश

**श्रीपूर** : मनोहर पारीकर इनडोअर स्टेडियम मडगाव (गोवा) येथे नुकत्याच घेण्यात आलेल्या राष्ट्रीय कराटे (मत्सोगी) स्पर्धेत श्रीपूर येथील विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या वजन गटांमध्ये आपल्या कलेचे विशेष प्राविण्य दाखवून एक सुवर्ण, एक रौप्य व दोन कास्य अशा चार पदकांची कमाई केली. विजयी स्पर्धक पुढिल प्रमाणे :- कु. प्रिशा खरात २२किलो. सुवर्ण पदक, कु.प्रेरणा मोरे २६ किलो. रौप्य पदक, राजनंदिनी गायकवाड ४० किलो. कास्य पदक , प्रथमेश पाटिल ७६ किलो. कास्य पदक . या विद्यार्थ्यांनां मेडल, प्रमाण पत्र व ट्रॉफीसह सुवर्ण व रौप्य पदकाला वैयक्तिक अनुक्रमे ३ हजार व १ हजार पाचशे रुपये रोख बक्षीस देऊन गौरविण्यात आले. या विद्यार्थ्यांना मुख्य कराटे प्रशिक्षक महादेव ताकतोडे सचिन ताकतोडे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांची २ ऑक्टोंबर रोजी जिल्हा क्रीडा संकुल येथे राज्य संघातून निवड करण्यात आली होती. श्री पांडुरंग कारखान्याचे कार्यकारी संचालक व कामगार कल्याण मंडळाचे मार्गदर्शक डॉ. यशवंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या श्री पांडुरंग क्रीडा संकुलामध्ये हे विद्यार्थी कराटे प्रशिक्षण घेत आहेत. या यशाबद्दल पांडुरंग कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी , कामगार कल्याण मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुधीर पोफळे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## लेकराचे हित फक्त माऊली बघत असते : वासकर

**पिलीव** : जगात लेकराचे हित फक्त माऊली बघत असते. त्यामुळे संतांनीही प्रथम क्रमांक आईला दिला आहे.आईची जागा कुणीही घेऊ शकत नाही.जसे आपली आई असते तसेच भारत माता,गंगा माता व गो माता असते.३३कोटी देवांचे स्थान गोमाते मध्ये आहे त्यामुळे मातेला अनन्यसाधारण महत्व आहे असे विचार ब्रम्हचैतन्य गोपाळ महाराज वासकर यांनी फळवणी ता माळशिरस येथे मांडले. फळवणी येथील शेतकरी, गो प्रेमी जोतिराम आवताडे यांच्या खिलार गाईचे गतवर्षी निधन झाले होते.महाराष्ट्र राज्यासह कर्नाटकात या गाईचा प्रदर्शनात अनेक वेळा प्रथम क्रमांक आला होता.या गाईने आपल्या मालकाचे नाव संपूर्ण महाराष्ट्रात तसेच कर्नाटकात ही गाजवले होते तिचे गेल्या वर्षी निधन झाले होते. आज तिच्या प्रथम पुण्यस्मरण प्रसंगी ब्रम्हचैतन्य गोपाळ अण्णा वासकर महाराज यांचे कीर्तन आयोजित केले होते.

## दोन दिवसीय ग्रंथोत्सवाचे आयोजन

**सोलापूर** : जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या वतीने शुक्रवार दिनांक १३ व शनिवार दिनांक १४ जानेवारी, २०२३ या कालावधीत 'ग्रंथोत्सव-२०२२' चे आयोजित शिवछत्रपती शिवाजी महाराज,सांस्कृतिकभवन,(रंगभवन)सोलापूरयेथेकरण्यातयेणारआहे. ग्रामीण व शहरी भागातील जनतेच्या वाचन संस्कृतीमध्ये वाढ व्हावी, या हेतूने राज्य शासनातर्फे ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात येते. जिल्ह्यातील ग्रंथप्रेमींना एकाच ठिकाणी विविध ग्रंथ प्राप्त व्हावेत, यासाठी तसेच प्रकाशक 'व ग्रंथविक्रेता यांना ग्रंथ विक्रीसाठी एकाच ठिकाणी आवश्यक ती सुविधा उपलब्ध व्हावी, हा ग्रंथोत्सव आयोजनाचा हेतू आहे. या अनुषंगाने ग्रंथदिंडी, परिसंवाद, व्याख्यान, कवी संमेलन आदी प्रबोधनात्मक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा या ग्रंथोत्सवात समावेश असणार आहे. तसेच साहित्य जगतातील नामवंत साहित्यिकांच्या ग्रंथ संपदेसाठी ग्रंथ दालन उभारले जाणार आहे. वाचन प्रेमींसाठी ही ग्रंथसंपदा वाचनासाठी व खरेदी करण्यासाठी उपलब्ध असणार आहे. या ग्रंथोत्सवामध्ये ग्रंथाचे स्टॉल लागणार असून इच्छुकांनी प्रमोद पाटील ९९२१८००४७५ प्रदीप गाडे ९५९४९८९२५० यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव यांनी केले आहे.

## तंटामुक्त समितीच्या सदस्याला दगडाने मारून दात पाडले

सुराज्य/सोलापूर

भांडण मिटवण्यास आमच्या वस्तीवर कोणास विचारून आला होता आला होता?या कारणावरून तंटामुक्त समितीच्या सदस्याला लाथाबुक्क्या तसेच दगडाने मारहाण करून दात तोडण्यात आले. ही घटना ढोकबाभुळगाव (ता. मोहोळ) येथे शनिवारी सकाळच्या सुमारास घडली.

बंडू शंकर मुळे (वय ४४ रा.ढोक बाभुळगाव ता.मोहोळ) असे जखमी झालेल्या तंटामुक्त समितीच्या सदस्याचे नाव आहे. त्यांन मारहाण केल्याप्रकरणी मोहोळच्या पोलिसांनी सावकार इंद्रजीत चव्हाण आणि भारत बब्रुवान चव्हाण (रा. ढोक बाभुळगाव) या दोघाविरुद्ध गुन्हा दाखल केला. काल सकाळी ९ वाजेच्या सुमारास बंडू मुळे हे मुलाला शाळेत सोडून घराकडे निघाले होते.

त्यावेळी सावकार चव्हाण याने त्याला वाटेत अडविले. आणि तू १५ दिवसांपूर्वी आमच्या भावकीत झालेले भांडण मिटवण्यासाठी वस्तीवर कोणास विचारून आला होता? असे म्हणत त्यांना लाथाबुक्क्याने मारहाण केली त्यानंतर एकाने दगड घेऊन त्यांच्या तोंडावर मारल्याने एक दात पडले. असे मुळे यांच्या फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास फौजदार शेख करीत आहेत.

## भित्तिपत्रके ही व्यक्तिमत्त्व विकासासाठी पोषक : प्राचार्य देसाई

सुराज्य/सोलापूर

महाविद्यालयीन जीवनातील विविध उपक्रमांतून विद्यार्थी आपल्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करू शकतात, त्यातून त्यांच्या ठाई कलागुणांचा विकास होऊ शकतो. भित्तिपत्रके ही व्यक्तिमत्व विकासासाठी पोषक ठरतात, म्हणून भित्तिपत्रकांचे वाचन, त्यासाठीचे लेखन विद्यार्थ्यांनी करायला हवे. असे मत संगमेश्वर कॉलेजचे प्र.प्राचार्य डॉ. राजेंद्र देसाई यांनी मांडले.

संगमेश्वर महाविद्यालयातील मराठी विभागाच्यावतीने नव्या वर्षाच्या प्रारंभाच्या पार्श्वभूमीवर प्रति वर्षाप्रमाणे 'मराठी भाषा आणि साहित्याच्या संवर्धना'संबंधीच्या उद्देशाने 'शब्दवीणा' या भित्तिपत्रकाचे प्रकाशन प्र.प्राचार्य डॉ.देसाई यांच्या हस्ते




करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी प्रास्ताविकात मराठी विभागप्रमुख प्रा. सुहास पुजारी यांनी भित्तिपत्रिकेच्या प्रकाशनामागची भूमिका स्पष्ट केली. सूत्र निवेदन डॉ. सारीपुत्र तुपेरे यांनी केले. याप्रसंगी उपप्राचार्य डी.एम. मेत्री, हिंदी विभागप्रमुख डॉ. संघप्रकाश दुड्डे, प्रा. महादेव देशमुख, डॉ. दादासाहेब खांडेकर, संतोष पवार, मकानदार आदी प्राध्यापक आणि विद्यार्थि- विद्यार्थिनी उपस्थित होते.

## ज्ञानयोगी सिध्देश्वर स्वामीजी चालते बोलते दैवत होते : डॉ. शेटे

सुराज्य/सोलापूर

ज्ञानयोगी श्री सिद्धेश्वर महस्वामीजी हे हिमालयाची उंची लाभलेले एक चालते बोलते दैवत होते, आपल्यासोबत राहून ते देहाने निघून गेले तरीही त्यांचे विचार चिरंतन तेवत राहतील,आजच्या युगात त्यांचे आदर्श विचार आपण आचरणात आणणे हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरेल असे प्रतिपादन शिवचरित्रकार डॉ. शिवरत्न शेटे यांनी केले.

लिंगैक्य श्री.सिद्धेश्वर महास्वामीजी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी भक्तगणांच्या वतीने श्रद्धांजली सभा आयोजित करण्यात आली होती त्या प्रसंगी डॉ.शेटे बोलत होते. नेहरुनगरच्या शासकिय मैदानावर पार पडलेल्या या सभेत प्रारंभी सिद्धेश्वर देवस्थानचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांच्या हस्ते स्वामींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.




यावेळी धर्मराज काडादी म्हणाले की, श्री.सिद्धेश्वर महास्वामीजी यांचे नवीन सिद्धेश्वर मंदिरांच्या नवीन सभामंडपात प्रवचन ठेवण्याचा संकल्प होता.मात्र ते आपल्यात राहिले नाहीत.पण त्यांच्या विचारानुसार जे जे करता येईल ते करण्याचा सिद्धेश्वर देवस्थानचा आणि सोलापूरकरांचा प्रयत्न राहील. संयोजक माजी आ. शिवशरण अण्णा पाटील म्हणाले की, सिध्देश्वर महास्वामीजींचा एक जरी विचार आचरणात आणला तरी आपले जीवन सार्थक होईल. मंद्रुप येथील व्याख्यानमाले प्रसंगी महिनाभर त्यांची सेवा करण्याची संधी लाभली हे माझे भाग्य समजतो, असे म्हटले. सिध्दारुढ निंबाळे म्हणाले की, महास्वामीजी यांचे ज्ञानयोगी आश्रम असलेले विजापूर व सोलापूर शहराचे एक वेगळे नाते आहे.त्यांचे विचार चिरंतन राहण्यासाठी सोलापूरच्या कंबर तलाव ते एस.आर.पी. कॅम्प पर्यंतच्या महामार्गाला श्री. सिद्धेश्वर महास्वामीजी महामार्ग असे नामकरण करावे डॉ.बसवराज बगले यांनी सिध्देश्वर महास्वामींचे आदर्श विचार आणि जीवनगाथा आपल्या आचरणात आणावी असे मत व्यक्त केले.

यावेळी काशीनाथ भतगुणकी, डॉ. मल्लिकार्जून तरनळळी, विशाल गायकवाड, बाबुराव तावसे, बसवराज कलशेट्टी, सुभाष पाटील, प्रा.भीमाशंकर बिराजदार, प्रशांत जोशी, पद्माकर कुलकर्णी, विजय शाबादी, राजशेखर पाटील, महेश घाडगे, इरेश खूने, शिवकुमार बागलकोटी, शिवशंकर याळगी, शिवानंद नसली, चंद्रकांत चोळके, गंगाधर पाटील, संजय लोणी, आप्पासाहेब नष्टे, गुरुसिद्धप्पा हाडसंगे, मल्लिनाथ अतनुरे, आनंद बिराजदार, प्रवीण ढेपे, राजू पुजारी, ए.टी. मुटाळे, शंकर कांबळे, मसुती, डॉ.राजू बिराजदार, बसवराज हळळी, संजय आळगी, सुरेश चौगुले आदी मान्यवर उपस्थित होते.

## भिंत ओली झाल्याच्या कारणावरून मारहाण

**सोलापूर** : फिर्यादीच्या शेजारी राहणारा चुलत भाऊ याने फिर्यादीचा भाऊ सत्यनारायण यास घराची सामाईक भिंत ओली झाली या कारणामुळे शिवीगाळ करून मारहाण केल्याची घटना घडली आहे.

ही घटना दि.३ जानेवारी रोजी सकाळी सातच्या सुमारास राहत्या घरी घडली. श्रीनिवास लिंगया गुंडेली (वय-३८,रा. शिव गणेश मंदिराजवळ नीलम नगर,सोलापूर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.मुरली पोशालू गुंडेली (रा.नीलम नगर,सोलापूर) असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल नवले हे करीत आहेत.

## प्रशासन आणि पत्रकारांची मैत्री विकासाला पूरक : जिल्हाधिकारी

सुराज्य/सोलापूर

पत्रकार हे फ्रेंड्स, फीलॉसॉफर आहेत. ते समाजाचा आरसा बनून वास्तव मांडत असतात. प्रशासनाची आणि पत्रकाराची मैत्री ही असलीच पाहिजे. त्यातून विकासाची प्रक्रिया गतिमान होते, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. मिलिंद शंभरकर यांनी केले.

सोलापूर श्रमिक पत्रकार संघ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'पत्रकारितेतील नवे प्रवाह' या विषयावर ८ जानेवारी २०२३ रोजी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन मंगळवेढेकर इन्स्टिट्युटच्या सभागृहात करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्या हस्ते झाले त्यावेळी ते बोलत होते.




▸▸ पत्रकार हा समाजाच्या समस्या मांडतो. परंतु पत्रकारांच्या समस्या मांडण्याचे काम आम्ही करत आहोत. मुद्रित माध्यमे झपाट्याने बदलत आहेत. त्यामुळे या बदलासोबत पत्रकारांनीही बदलण्याची गरज आहे. नागपूर नंतर निवृत्ती नंतर जर कुठे राहायला आवडेल तर ते सोलापूर आहे. येथे तीन भाषांचे संगम असणार म्हणजे सोलापूर शहर आहे. असे मत ज्येष्ठ पत्रकार यदु जोशी व्यक्त केले

▸▸ डिजिटल मीडिया, सोशल मीडियामुळे इलेक्ट्रॉनिक माध्यमात नवे बदल होताना दिसत आहेत. आता घडलेली बातमी सोशल मीडियावर लगेच वाचकांना पाहायला मिळते. मुद्रित माध्यमा प्रमाणेच इलेक्ट्रॉनिक माध्यमावर लोकांचा मोठा विश्वास आहे. या माध्यमाची एक ठराविक पद्धतीची भाषा असते. चित्रफीत, आवाज, शब्द याचे वेगळ्यापद्धतीने सादरीकरण करून ही वेगळी भाषा विकसित होत राहते. असे मार्गदर्शन मयुरेश कोन्नूर यांनी केले.

▸▸ निश अर्थात एखाद्या विषयावर सातत्याने सखोल लेखन करणे महत्त्वाचे आहे. डिजिटल पत्रकारितेत बातम्यांची संख्या आणि वेगळेपणा असावा. गुगल डसेन्स कंपनी आपली धोरणे सतत बदलत आहे. त्याचाही अभ्यास करायला हवा. डिजिटल पत्रकारितेसमोर अनेक संकटे आहेत. नवे बदल स्वीकारायला हवेत. तंत्र साक्षर बनावे. टेक्नोलॉजी कंपन्यामध्ये कंटेंट क्रिएटरच्या नोकरीच्या खूप संधी असल्याचे मत विश्वनाथ गरूड व्यक्त केले.

खरतर ट्राफिक, गुन्हेगारी किंवा समाजामध्ये शांती व सुव्यवस्था कायम व सुव्यवस्था अबादीत ठेवण्यासाठी पत्रकारांचे खूप सहकार्य मिळत असते. पत्रकारांचे कार्य समाजाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे.

**-राजेंद्र माने (पोलीस आयुक्त)**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामध्ये पत्रकार घडवण्याचे काम करत आहोत. तरुण हा डिजिटल युगाशी जोडला गेलेला आहे. त्याला त्याबाबतची माहिती देण्याचे काम आता तर करत आहोत. येणाऱ्या काळातही हे काम जोमाने करू. कुठलेही क्षेत्र असुदे तिथे पत्रकारिता व लीगल टीम असणं हे गरजेचं आहे.

**-डॉ.मृणालिनी फडणवीस (कुलगुरु)**

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून पोलिस आयुक्त राजेंद्र माने ,कुलगुरु डॉ.मृणालिनी फडणवीस होते.

मुद्रित माध्यमातील नवे प्रवाह या विषयावर ज्येष्ठ पत्रकार यदु जोशी, इलेक्ट्रॉनिक माध्यमातील नवे प्रवाह या विषयावर मयुरेश कोन्नूर तर डिजिटल माध्यमातील नवे प्रवाह या विषयावर विश्वनाथ गरूड यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, मयुरेश कोन्नूर, विश्वनाथ गरुड, मास कम्युनिकेशन विभागाचे प्रमुख डॉ. रवींद्र चिंचोलकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता हुल्ले, डॉ. बाळासाहेब मागाडे, डॉ. अंबादास भासके, ऋषीकेश मंडलिक यांनी केले.

# शिंदे बंधूंमुळे 'गोकुळ शुगर'ला गतवैभव

✔ सुराज्य/अक्कलकोट

**दिवंगत भगवानराव शिंदे यांच्या अकाली निधनामुळे गोकुळ परिवारावर मोठे संकट कोसळले होते. यापुढे गोकुळ परिवारचे काय होणार यांची चिंता मात्र तमाम तालुकावासियांना लागली होती. या सर्व संकटाला सामोरे जात धोत्री येथील गोकुळ शुगरचे चेअरमन दत्ता शिंदे, मॅनेजिंग डायरेक्टर कपिल शिंदे, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर विशाल शिंदे या शिंदे बंधूंच्या योग्य नियोजन व कठीण परिश्रमामुळेच सध्या गोकुळ शुगर इंडस्ट्रिजला पुन्हा एकदा अच्छे दिन आल्याचे पहायला मिळत आहे.**

गोकुळ शुगरचे चेअरमन दत्ता शिंदे, कपिल शिंदे व विशाल शिंदे या तीन नवयुवक शिंदे बंधूनी संस्थापक अध्यक्ष बलभीम भाऊ शिंदे व दिवंगत भगवानराव शिंदे यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जणू पेटून उठल्याचे पहायला मिळत आहे. संस्थापक अध्यक्ष बलभीम भाऊ शिंदे व दिवंगत भगवानराव शिंदे यांचा आदर्श डोळयासमोर ठेवून त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सध्या शिंदे बंधू सरसावले आहेत. कारण कमी कालावधीतच गोकुळ शुगरला आर्थिक संकटातून बाहेर काढून पुन्हा एकदा गोकुळ शुगरला नाव लौकिक मिळवून दिल्याने शिंदे बंधूचे सर्वत्र विशेष कौतुक होत आहे.इतकेच नव्हे तर महाराष्ट्रातील साखर सम्राटासमोर एक नवा आदर्श निर्माण करण्यात शिंदे बंधू यशस्वी झाल्याचे बोलले जात आहे.जेंव्हा चेअरमन दत्ता शिंदे यांनी गोकुळ शुगरचा ताबा घेतला तेव्हा असा काही धाडसी निर्णय घेण्यात आला की, 'सर्वांनाच अश्चर्याचा धक्का बसला. शिंदे बंधूचा प्रत्येक निर्णय हा सर्व सामान्य शेतकरी हित डोळयासमोर ठेवून घेतलेल्या निर्णयाचे जनमानसातून जोरदार स्वागत होताना ही दिसून आले. शेतकऱ्यांचे हित जपणाऱ्या निर्णयामुळेच शिंदे बंधू प्रसिध्द जोतात येताना दिसतात. शिंदे बंधूनी घेतलेल्या निर्णयामुळेच गोकुळ परिवार जनमानसात विश्वास संपादन करण्यात यशस्वी होत आहे.

उस उत्पादक शेतकऱ्यांचे हित डोळयासमोर ठेऊन घेतलेल्या प्रत्येक धाडसी निर्णयामुळेच सध्या गोकुळ परिवार चर्चेत आल्याचे दिसतात. शिंदे बंधूनी संकटाच्या काळात घेतलेल्या निर्णयामुळेच महाराष्ट्रातील बड्या राजकीय नेत्यांचा ही गोकुळ परिवाराला सहकार्य लाभताना दिसून येत आहे. महाराष्ट्र राज्याचे विधानसभा विरोधी पक्षनेते अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली सध्या अक्कलकोट तालुका व विधानसभा मतदारसंघात चेअरमन दत्ता शिंदे यांना बळ मिळत आहे. यामुळेच येत्या काळात चेअरमन दत्ता शिंदे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश निश्चित मानला जात आहे. चेअरमन दत्ता शिंदे यांच्यामुळे तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला आणि कार्यकर्त्यांना मोठे बळ मिळणार असल्याचे बोलले जात आहे. यामुळेच सध्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात उत्साहा संचारला आहे. कारण गेल्या अनेक वर्षांपासून अक्कलकोट तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसचा म्हणावा तसा विस्तार होताना दिसून आला नाही. यामुळेच तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद ही मर्यादितच राहिली गेली आहे. चेअरमन दत्ता शिंदे यांच्या प्रभावी नेतृत्वामुळे आता तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ताकद वाढणार असल्याचे बोलले जात आहे.


विशाल शिंदे


कपिल शिंदे


दत्ता शिंदे

दत्ता शिंदे यांच्या योग्य नियोजन व प्रभावी नेतृत्वामुळे सध्या गोकुळ शुगर कारखाना प्रगतीपथावर आला आहे. दत्ता शिंदे यांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे एका वर्षातच गोकुळ शुगर कारखाना आर्थिक संकटातून मुक्त झाला आहे.

सध्या दत्ता शिंदे यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य दर देऊन न्याय देण्याचा प्रयत्न केला गेला आहे. यामुळेच तालुक्यात सामान्य नागरिक व उस उत्पादक शेतकऱ्यांचा गोकुळ शुगरला प्रतिसाद वाढताना दिसून येत आहे. तालुक्यात दत्ता शिंदे यांच्या रुपाने नवा चेहरा जनतेसमोर आणून तालुक्यात काँग्रेस व भाजपा समोर एक नवा पर्याय उभा करण्याचा प्रयत्न सध्या राष्ट्रवादीकडून सुरु आहे.आजपर्यंत कारखानास्थळावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या मोठ-मोठ्या नेत्यांना आणून चेअरमन दत्ता शिंदे यांनी आपले राजकीय वजन दाखवून दिले आहे.

सध्या वडिलांची आमदारकीची इच्छा पूर्ण करण्यासाठी चेअरमन दत्ता शिंदे येत्या काळात पूर्ण वेळ राजकारण व समाजकारण करण्याची तयारी ठेवल्याचे बोलले जात आहे. म्हणूनच यावर्षीच्या गळींत हंगामाला ऊस घालणाऱ्या शेतकऱ्यांनाही योग्य दर देण्याबरोबरच त्यांचा सर्व ऊस अडचणीविना आपण कारखान्याला घेऊन जाण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवल्याचे सांगितले आहे. तरीही काही शेतकऱ्यांच्या अडचणी असल्यास थेट संपर्क साधण्याचे आवाहन ही चेअरमन दत्ता शिंदे यांनी केले आहे.



## लिंगायत हटगार कोष्टी समाज जिल्हाध्यक्षपदी हिटनळी

✔ **सुराज्य/अक्कलकोट** : करजगी येथे समस्त लिंगायत हटगार कोष्टी समाज बांधवांचा बैठक आयोजित करण्यात आला होता. यावेळी करजगी समाज बांधवांकडून लिंगायत हटगार कोष्टी समाज सोलापूर जिल्हाअध्यक्ष सिध्दारूढ हिटनळी, जिल्हा कार्याध्यक्ष सिध्दाराम चिंचोळे, संचालक नागराज कोंडे, अक्कलकोट तालुका उपाध्यक्ष नागेश, दक्षिण तालुका खजिनदार चेतन अंकद इकळकी यांचे सत्कार करण्यात आले. यावेळी अरविंद खजुरगी, सिध्देश्वर झुंजा, श्रीशैल खजुरगी, परमेश्वर अंबलगी, सर्व ग्रामस्थ व समाज बांधव उपस्थित होते. यावेळी विविध विषयावर चर्चा तसेच समाज वाढीसाठी सर्वांनी एकत्र येऊन प्रत्येकाच्या उन्नतीसाठी चर्चा करून समाजाचे ट्रस्ट स्थापन करण्याबाबत एकमत झाले.




## युवकांनी स्वत:चे व्यक्तिमत्त्व घडवावे : डॉ. आवाड

✔ **सुराज्य/अकलूज** : 'तरुणांनी आदर्श जीवन जगण्यासाठी निर्णय क्षमता, भावनांवर नियंत्रण, तटस्थता आणि वस्तुस्थिती विचारात घ्यायला हवा. आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवींत समोरच्या व्यक्तिंच्या दोन्ही बाजू ऐकून घ्यायला पाहिजेत. समाज माध्यमांचा वापर करताना केवळ प्रतिक्रियावादी न होता भूमिकावादी व्हा.केवळ व्यक्ती बनण्यापेक्षा व्यक्तिमत्त्व बनवा, असे मत डॉ. विश्वनाथ आवाड यांनी व्यक्त केले.'

माळशिरस तालुक्यातील मौजे चाकोरे येथे शंकरराव मोहिते महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्यावतीने आयोजित केलेल्या युवकांचा ध्यास ग्राम-शहर विकास विशेष श्रमसंस्कार शिबिरात युवकांना मार्गदर्शन करताना डॉ. विश्वनाथ आवाड बोलत होते. यावेळी ॲड. चंद्रकांत शिंदे, सरपंच नवनाथ जाधव, उपसरपंच सचिन कचरे, किरण भांगे, सागर वरकड, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सविता सातपुते, डॉ. सज्जन पवार, डॉ. दत्ता मगर व ग्रामस्थ उपस्थित होते. प्रास्ताविक पूजा जाधव हिने केले. सूत्रसंचालन ऋतुजा ससाणे, स्नेहल मगर यांनी केले तर आभार सिध्दी मगर हिने मानले.

## शेतातून वाहन नेल्याने शिवीगाळ करुन धमकी; तिघांवर गुन्हा

✔ **सुराज्य/सोलापूर** : शेतातून छोटा हत्ती पिकअप वाहन नेल्याने तीन जणांविरुध्द फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना दि. ७ जानेवारी रोजी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास स्वराज्य हॉटेल केगाव येथे घडली. याप्रकरणी सुरेंद्र बसवराज शिरकोळी (वय-३९, रा. कृष्णा टावर, दर्बी हाउसच्या पाठीमागे) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून तुळशीदास लक्ष्मण शिंदे, अक्षय अनिल गुंड, शेषबाई विजय दळवे (सर्व रा. केगाव) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी हे त्यांचे चार चाकी वाहन क्र. एम. एच. १३. सीयु. ०५८५ हा छोटा हत्ती पिकअप केगाव येथील फिर्यादी यांच्या मालकीच्या शेतातून घेऊन जात असताना वरील संशयित आरोपी यांनी फिर्यादी यांना अडवून शिवीगाळ करून धमकी दिली आहे, असे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल घुगे हे करीत आहेत.

## विनापरवाना आंदोलन; प्रहार संघटनेच्या प्रमुखासह ५ जणांवर गुन्हा

✔ **सुराज्य/सोलापूर** : विनापरवाना बेकायदेशीररित्या जमाव जमवून आंदोलन केल्याप्रकरणी प्रहार संघटनेचे संपर्कप्रमुख जमीर शेख, कार्याध्यक्ष खालील मणियार, रेश्मा मुल्ला, आकीब नाईकवाडी, इब्राहिम जमादार (सर्व रा. सोलापूर) यांच्याविरुध्द सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. वरील संशयित आरोपी यांनी मिळून एमआयडीसी पोलीस ठाणे येथील अकस्मात मयत मधील मुलगी कुमारी ऐमन बंदेनवाज बिराजदार (वय-७) हिचा विजेचा शॉक लागून मृत्यू झाल्याने तिचे प्रेत शवविच्छेदन करून पुढील अंत्यविधी करिता त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले. त्यानंतर वरील संशयित आंदोलनकर्त्यांनी विनापरवाना व बेकायदेशीर जमा जमून संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर गुन्हा दाखल करा व पालकांना नुकसान भरपाई द्या, असे म्हणून आंदोलन करून सरकारी काम करण्यासाठी येणारे डॉक्टर व कर्मचारी यांना अटकाव केला आहे, अशा आशयाची फिर्याद पोकॉं नितेश रमेश काळे यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात दिली आहे. या घटनेचा पुढील तपास मपोना वाघमोडे या करीत आहेत.

## सोलापूर मॅरेथॉन पुरूषांमध्ये अमोल यादव तर महिलांमध्ये मोयुंगा क्रिस्टाईनने मारली बाजी

✔ सुराज्य/सोलापूर



सोलापूर रनर्स असोसिएशनच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या आपटे डेअरी आंतरराष्ट्रीय सोलापूर मॅरेथॉनमध्ये २१ किलोमीटर पुरूष गटात सोलापूर जिल्ह्यातील कामतीचा अमोल यादव तर महिला गटात केनियाची मोयुंगा क्रिस्टाईन हिने प्रथम क्रमांक मिळवत विजय संपादन केले.

गेल्या सहा महिन्यापुर्वीपासून तयारी करण्यात येत असलेल्या सोलापूर रनर्स असोसिएशनच्या सोलापूर मॅरेथॉन स्पर्धा रविवार दि. ८ जानेवारी २०२३ रोजी सकाळी पार पडली. २१ किलोमिटर, १० किलोमिटर आणि साडेतीन किलोमिटर अशा तीन गटामध्ये झालेल्या या स्पर्धेत जवळपास ३ हजार धावपटूंनी सहभाग घेतला होता. या मॅरेथॉनपुर्वी दर रविवारी धावपटूंसाठी विशेष प्रशिक्षण देण्यात आले होते. सोलापूर शहर जिल्ह्यासह जिल्ह्याच्या बाहेरील आणि देशाच्या बाहेरील म्हणजेच केनिया या देशातील धावपटूंनी यामध्ये सहभाग घेतला होता. पहाटे ५ वाजता सर्व धावपटूंना एकत्र करून हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर वॉरमाप तसेच झुंबा डान्स घेण्यात आला. त्यानंतर ज्ञानप्रबोधिनी विद्यालयाच्या समोर पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने यांच्या हस्ते २१ किलोमिटर मॅरेथॉन स्पर्धेला सकाळी ६.३० वाजता त्यानंतर ६.४५ वा. १० किलोमिटर मॅरेथॉन स्पर्धेलाही झेंडा दाखवून सुरूवात झाली. त्यानंतर पोलीस उपायुक्त दिपाली काळे यांच्या हस्ते सकाळी ७.३० वाजता फन रन म्हणजेच साडेतीन किलोमिटरच्या मॅरेथॉन स्पर्धे ला प्रारंभ करण्यात आला.

**कोरोना नंतरच्या सोलापूर मॅरेथॉनमध्ये धावपटूंचा उत्साह आणि जल्लोष**

स्पर्धेतील विजेत्यां धावपटूंना आमदार प्रणिती शिंदे, स्पर्धेचे प्रायोजक आपटे डेअरीचे आल्हाद आपटे, विनय आपटे, सारंग आपटे, गायत्री आपटे, शार्दुल आपट तसेच मान्यवरांच्या हस्ते बक्षिसांचे वितरण करण्यात आले. सोलापूर रनर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. स्वप्नील कोठाडीया, कार्याध्यक्ष डॉ. विश्वास बिराजदार, खजिनदार डॉ. योगेश जडे, रेस डायरेक्टर डॉ. विक्रम दबडे, माजी अध्यक्ष डॉ. यशवंत पेठकर, डॉ. विनायक देशपांडे, डॉ. विवेक कुलकर्णी, डॉ. भास्कर पाटील, डॉ. नितीन बलदवा, डॉ. गोरख रोकडे, डॉ. गुरू जालीमिंचे, डॉ. किरण किणीकर, डॉ. महेश बिलुरे, डॉ. प्रदीप भोई, डॉ. सुभाष भांगे, अभय देशमुख, अजित वाडेकर, बसवराज कडगंची , संजय सुरवसे, जयंत होलेपाटील, श्रीनिवास संगा, स्वप्नील नाईक, रोषण भुतडा, ओंकार दाते, डॉ. विठ्ठल कृष्णा, नूमवि आणि ह.दे.प्रशालेचे मुख्याध्यापिका, शिक्षक कर्मचारी तसेच ॲथलेटि्निस असोसिएशनचे सर्व पदाधिकारी सदस्य आणि जिल्हा क्रिडा शिक्षक संघटनेचे सर्व पदाधिकारी आणि सदस्य यांचे मोलाचे सहकार्य सोलापूर मॅरेथॉनला लाभल्याने ही मॅरेथॉन यशस्वीपणे पार पडली.

## न्यू गोल्डन स्पोर्ट्स क्लबचे कार्य कौतुकास्पद : मांजरे

✔ सुराज्य/द. सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुप येथील न्यू गोल्डन क्लबच्यावतीने वाड्या वस्तींवरुन सरावासाठी येणाऱ्या मुलींना अडचण निर्माण होऊ नये म्हणून न्यू गोल्डन क्लबचे संस्थापक बबलू शेख यांनी नवीन वर्षाच्या दिवशीच एक अनोखा उपक्रम म्हणून कल्बच्यावतीने लकी ड्रॉ पद्धतीने एका गुणवंत खेळाडू अल्फिया नदाफ या खेळाडूस मंद्रुपचे सपोनि रवींद्र मांजरे यांच्या हस्ते सायकल प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात मंद्रुप पोलीस ठाण्यातील खो-खो मैदानाचे पूजन मांजरे,पत्रकार पंचाक्षरी स्वामी व सुर्योदय चॅनलचे संपादक पत्रकार महेश पवार, सामाजिक कार्यकर्ते सुरज खडाखडे व न्यू गोल्डन क्लबच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले. मांजरे यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, 'मुलांनी खेळ खेळत असताना खेळाडूवृत्ती जोपासली पाहिजे व याच संबंधित खेळाच्या माध्यमातून जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय स्तरापर्यंत चमकून आपली योग्यता सिध्द करून दाखविले पाहिजे. त्याचबरोबर न्यू गोल्डन स्पोर्ट्स क्लबचे संस्थापक बबलू शेख यांनी मनोगतातून समाजातील दानशूर व्यक्तींनी गरजू विद्यार्थी व खेळाडूंना मदत करण्याचे् आवाहन करून नव वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास पोलिस कॉन्स्टेबल सागर चव्हाण, पत्रकार विकास सोनवणे, संतोष पतंगे, न्यू गोल्डन स्पोर्ट्स क्लबचे संस्थापक बबलू शेख, अध्यक्ष इब्राहिम शेख, उपाध्यक्ष प्राध्यापक डॉक्टर शिवानंद तोरवी, सद्दाम शेख, आरिफ नदाफ, प्रशिक्षक फैय्याज बागवान, आसिफ अफसर शेख, आयाज बागवान, आसिफ शेख, अक्षय शेंडगे, नितीन तरंगे, रियाज शेख, न्यू गोल्डन क्लबचे खेळाडू उपस्थित होते.सूत्रसंचालन पत्रकार पंचाक्षरी स्वामी यांनी केले तर आभार न्यु गोल्डन क्लबचे संस्थापक बबलू शेख यांनी मानले.

## ग्राहक पंचायतीतर्फे पत्रकारांचा सन्मान

✔ सुराज्य/सांगोला

अखिल भारतीय ग्राहक पंचायत शाखा सांगोला यांचेवतीने मराठी वृत्तपत्र सृष्टी तील पहिले पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे जन्मदिनानिमित्त सर्वत्र पत्रकारदिन विविध उपक्रमाने साजरा केला जातो, याचे औचित्य साधून सांगोला शहर व तालुका परिसरातील विविध दैनिकांचे प्रतिनिधी सांगोला येथून प्रसिद्ध होणाऱ्या दैनिक व साप्ताहिकाचे संपादक डिजिटल मीडियाचे प्रतिनिधी आदी विविध पत्रकारांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी गेल्या वर्षभरात विविध वृत्तपत्राच्या माध्यमातून सामान्य जनतेच्या प्रश्नाला वाचा फोडून अन्याय न्याय मिळवून देण्यासाठी व प्रशासनाचे विविध प्रश्नाकडे लक्ष वेधून ते प्रश्न मार्गी लावण्यासाठी महत्त्वाची कामगिरी पार पाडणारे व कोरोना सारख्या काळात स्वतःच्या जीवाची परवा न करता आपले कर्तव्य चोखपणे बजावणाऱ्या पत्रकारांच्या उल्लेखनीय कार्याचे विशेष कौतुक ग्राहक पंचायतीच्यावतीने करण्यात आले.

## नातेपुते ग्रामीण रुग्णालयात रक्त तपासणीचे यंत्र

✔ सुराज्य/नातेपुते

आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर महाराष्ट्रातील पहिला दौरा नातेपुते ग्रामीण रुग्णालय नातेपुते येथे केला होता तेथील पाहणी करून रुग्णांना येणाऱ्या समस्या व अडचणी तात्काळ दूर करण्यासंदर्भात संबंधितांना आदेश दिले होते.

माळशिरस तालुका शिवसेनाप्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांनी रुग्णालयातील अडचणी समजून आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली रक्त तपासणीची मशीन रुग्णांसाठी मोफत उपलब्ध करून दिली. सोलापूर जिल्ह्याचे सिव्हिल सर्जन प्रदीप ढेले, डॉ. गुडे, डॉ. प्रणव सातव, ओएसडी प्रवीण लटके, बाळासाहेबाची शिवसेना तालुकाप्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांनी मशीनचे उद्घाटन करून सदर रक्त तपासणीची मशीन रुग्णांसाठी सुरू केली.

खाजगी रुग्णालयात रक्ताच्या टेस्ट करण्यासाठी ३०० रुपये ते ५०० रुपये रुग्णांना मोजावे लागतात. ग्रामीण रुग्णालयात अनेक मोलमजूर करणारे रुग्ण तपासणीसाठी येत असतात. ही मशीन उपलब्ध करून दिल्याबद्दल व तपासणी मोफत होणार असल्याने रुग्णांमधून आनंद व्यक्त होत आहे. यावेळी बोलत असताना राजकुमार पाटील म्हणाले की, 'आरोग्य मंत्री तानाजीराव सावंत, जिल्ह्याचे संपर्कप्रमुख शिवाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा अतिशय चांगल्या पद्धतीने कामकाज करीत आहे माळशिरस तालुक्यातील सर्व शासकीय दवाखाने एक गरिबांसाठी पर्वणी ठरत आहेत आरोग्यमंत्र्यांनी सुरक्षित माता सुरक्षित घर हे अभियान राबवून देशात लौकिक मिळवला याची दखल देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब यांनी सुद्धा घेतली भविष्यातील कोणत्याही कामासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही असे आश्वासन आरोग्य मंत्री तानाजीराव सावंत साहेब व जिल्ह्याचे संपर्कप्रमुख शिवाजीराव सावंत यांनी दिले असल्याचे मत राजकुमार हिवरकर पाटील यांनी व्यक्त केले. डॉ. प्रणव सातव म्हणाले या मशीनमुळे रुग्णांना साथीचे ताप, वायरल इन्फेक्शन, डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया, हात्ती रोगाचे निदान तात्काळ होणार आहे त्यामुळे उपचार करायला खूप मोठ्या प्रमाणावर मदत या मशीनची होणार आहे अचूक निदान झाल्यामुळे रुग्णांना तात्काळ रिलीफ मिळणार आहे.

## निधन वृत्त

### शिवराम पोतदार



✔ **सुराज्य/अक्कलकोट** : भुरीकवठे येथील ज्येष्ठ कलावंत शिवराम पोतदार यांचे वयाच्या ८१व्या वर्षी निधन झाले. सोमवार ९ जाने. २०२३ रोजी स. ११.०० वा. त्यांच्या राहत्या घरापासून अंत्ययात्रा निघणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, मुली व नातवंडे असा परिवार आहे. श्री. एस. एस. प्रशाला व क. महाविद्यालय वागदरी येथील प्रा. चंद्रकांत पोतदार यांचे ते वडील होत.

### बबलू नाईकवाडी



✔ **सुराज्य/विरवडे बु.** : कामती पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बबलू उर्फ खलील अहमद सैफन नाईकवाडी वय ५५ यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते सिव्हिल चौक सोलापूर येथे वास्तव्यास होते. मागील पाच वर्षांपासून ते कामती पोलीस स्टेशन येथे कुरुल बिटला कार्यरत होते.

## जैन बालमुनींच्या अद्भूत स्मरणशक्तीचे घडले दर्शन

✔ सुराज्य/सोलापूर

**अचाट स्मरणशक्ती, अद्भूत पाठांतर अन् ओघवत्या भाषाशैलीचे दर्शन रविवारी सोलापूरकरांना घडले. जैन बालमुनी श्री नमीचंद्रसागरजी महाराज आणि श्री नेमिचंद्रसागरजी महाराज यांच्या ट्वीन्स बाल शतावधान प्रयोगाला सोलापूरकर भाविकभक्तांनी जोरदार टाळ्यांच्या गजरात दाद दिली.**

परमार परिवार आणि श्री जैन श्वेतांबर मंदिर ट्रस्ट यांच्यातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाशतावधानी अभिनंदनचंद्र सागरजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात उपस्थित प्रत्येकाला वही आणि पेन देण्यात आले होते. उपस्थित नागरिकांनी एक एक करून काही सुविचार, काही गणिती कोडे, विविध देशांची नावे, देशभक्त - वैज्ञानिकांची नावे, सणांची नावे, तीर्थस्थळांची नावे, योगासनांची नावे सांगितली. तसेच दोन्ही जैन बालमुनींना नागरिकांकडील १५ वस्तू दाखविण्यात आल्या.

नागरिकांनी सांगितलेल्या १०० बाबी सर्वांनी क्रमाने लिहून घेतल्या. यानंतर जैन बालमुनींनी अनेक लोकांद्वारे विचारलेल्या तब्बल १०० वेगवेगळ्या प्रश्नांची सरळ आणि उलट्या क्रमाने तसेच अनियमित क्रमाने उत्तरे दिली. तसेच डोळ्यांवर पट्टी बांधून क्यूब, पिरॅमिड सोडवून दाखवले. यावेळी उपस्थितांनी टाळ्या वाजवून तसेच जैन बालमुनींचा जयजयकार करत दाद दिली. जैन बालमुनींची उत्तरे ऐकून उपस्थित अवाक् झाले. यावेळी त्यांचे प्रवचन झाले. याप्रसंगी कनुभाई शहा, मोहनलाल परमार, चंदूलाल परमार, योगेश परमार, कल्पेश परमार, अमित परमार, अशोक जैन उपस्थित होते.



### पुढील ६ महिन्यात कधीही सांगू शकतील

रविवारी सांगितलेल्या १०० बाबी जैन बालमुनी पुढील ६ महिन्यांत कधीही विचारले तरी सांगू शकतील, इतकी त्यांची एकाग्रता आणि स्मरणशक्ती आहे, असे त्यांचे गुरू महाशतावधानी अभिनंदनचंद्र सागरजी महाराज यांनी याप्रसंगी सांगितले. या दोन्ही जैन मुनींना १२ हजार श्लोक पाठ आहेत. तसेच त्यांना १० भाषा येत असून सर्व धर्मग्रंथ तोंडपाठ असल्याचे सांगताच उपस्थितांनी वाहवा केली.

### काय आहे शतावधान?

शतावधान म्हणजे एकाच वेळी अनेक लोकांद्वारे विचारलेल्या तब्बल १०० वेगवेगळ्या प्रश्नांची सरळ आणि उलट्या क्रमाने तसेच अनियमित क्रमाने उत्तर देणे. सामान्य व्यक्ती एकावेळी अधिकाधिक १० ते १५ बाबी लक्षात ठेवू शकतो. परंतु शतावधानद्वारे एकाच वेळी १०० प्रश्नांची उत्तरे बिनचूक देण्याचा अभ्यास ध्यानसाधनेच्या माध्यमातून करुन प्रचंड एकाग्रता साधता येते.

# ऊस उत्पादकांचा विश्वास संपादन करण्यात 'जयहिंद' शुगर यशस्वी

**सुराज्य/अक्कलकोट**

आचेगांव (ता. दक्षिण सोलापूर) येथील जय हिंद शुगरने चालू गाळप हंगामात केवळ तीस दिवसात दोन लाख मेट्रीक टन ऊस गाळप करण्यात यश मिळवल्याने जयहिंद शुगरचे चेअरमन गणेश माने-देशमुख व मुख्य मार्गदर्शक बब्रुवान माने-देशमुख व कारखाना व्यवस्थापनाकडून सर्व अधिकारी, कर्मचारी, ऊस उत्पादक शेतकरी, ऊस तोडणी कामगार व वाहतुक ठेकेदार यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

दीपावली पाडव्याच्या मुहूर्तावर खासदार डॉ. जयसिध्देश्वर महास्वामी यांच्या हस्ते गाळप हंगामाला सुरुवात करण्यात आली होती. त्यानंतर परतीचा पाऊस व ऊस आंदोलनामुळे तीन ते चार दिवस कारखानास्थळावर ऊस गाळप ठप्प झाले होते.त्यानंतर दि १ नोव्हेंबर पासून सुरळीत कारखान्याच्या गाळप हंगामाला सुरुवात झाली. दि. १ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२२ पर्यंत केवळ तीस दिवसात दोन लाख मेट्रीक टन उस गाळप करुन जयहिंद शुगर ने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिल्याचे चेअरमन गणेश माने-देशमुख व मुख्य मार्गदर्शक बब्रुवान माने-देशमुख यांनी सांगितले. एकीकडे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा वाढता प्रतिसाद पहाता कारखानास्थळावर उसाने भरलेल्या भरगच्च गाड्यांच्या रांगा पहाता कारखाना व्यवस्थापका समोर कमी कालावधीतच अधिक ऊस गाळप करण्याचे एक मोठे आव्हान असताना चेअरमन गणेश माने-देशमुख व कारखान्याचे मुख्य मार्गदर्शक बब्रुवान माने-देशमुख व कारखाना व्यवस्थापनाच्या योग्य नियोजनामुळे हे शक्य झाल्याचे बोलले जात आहे.यंदाच्या गाळप हंगामात जयहिंद शुगर १२ लाख मेट्रीक टन उस गाळपाचा उद्दिष्ट ठेवला आहे.यासाठी कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी, ऊस उत्पादक शेतकरी, ऊस तोडणी कामगार व वाहतुक ठेकेदार व व्यवस्थापकांनी हे उद्दिष्ट गाठण्यासाठी सध्या जोमाने कामाला लागल्याचे पहायला मिळत आहे.यंदा गाळप हंगाम सुरु होण्यापूर्वीच चेअरमन गणेश माने-देशमुख व मुख्य मार्गदर्शक बब्रुवान माने-देशमुख यांनी अतिरिक्त उसाची व शेतकऱ्यांची गरज ओळखून दररोज १२ हजार मेट्रीक टन ऊस गाळपाला सुरुवात करणार असल्याचे सांगितले होते.त्याच प्रमाणे सध्या दररोज वाढीव गाळप हंगामाला सुरुवात झाल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे. यंदा अक्कलकोट तालुका व दक्षिण सोलापूर तालुक्यात विक्रमी उसाची लागण झाल्याने बहुसंख्य शेतकरी बांधवांना ऊस वेळेवर जाईल की नाही यांची चिंता सतावत होती.आता शेतकऱ्यांची ही चिंता जयहिंद शुगरने दूर केल्याचे पहायला मिळत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन उभारलेली जयहिंद शुगर कारखाना गेल्या गळीत हंगामापासूनच ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या मदतीला धावून आला आहे.वाढीव गाळप क्षमतेमुळे कमी कालावधीत अधिक ऊस गाळप करणे जयहिंद शुगरला शक्य होत असल्याचे चेअरमन गणेश माने-देशमुख व मुख्य मार्गदर्शक बब्रुवान माने-देशमुख यांनी सांगितले. दररोज एक लाख लिटर इथेनॉल निर्मिती तर रोज ३६ मेगावॅट वीज निर्मिती करुन शेतकऱ्यांच्या उसाला योग्य भाव देण्याचा प्रयत्न जयहिंद शुगर कडून सुरु आहे.




### एकरी ९० टन ऊस उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांचा होणार गौरव

जयहिंद शुगर कारखान्याच्या चालू गळीत हंगामात ऊस उत्पादक शेतकर्यांना प्रोत्साहन देण्यासाठी बळीराजांचा सन्मान करण्यात येणार आहे. जो शेतकरी एका एकरात ९० टनापेक्षा जास्त उत्पादन घेईल, त्या शेतकर्यांचा श्री हिरेमठ संस्थान गौडगांवच्या वतीने योग्य पारितोषिक देऊन सन्मान करण्यात येणार आहे.

### आस्मानी संकटावर जयहिंदची मात

यंदा पुष्य नक्षत्राच्या दमदार पावसाने आचेगाव, हंजगी, हालचिंचोळी व वळसंग परिसरात ढगफुटीसदृश्य पावसाने दाणादाण उडवली होती. सलग चार तास पावसाची बॅटिंग सुरुचअसल्याने आणि परिसरात शेत शिवारात सर्वत्र पाण्याची पातळी वाढत असताना ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते.अनेकांच्या शेतातील बांध फुटून मोठ्याप्रमाणात शेत शिवारातील माती वाहून घेल्याने शेतकरी हतबल झाले होते तर गावातील अनेक घराचे पडझड झाल्याने गावातील अनेक कुटुंबाचे संसार पूर्ती उघड्यावर पडले होते ,तर अनेक शेतकऱ्यांचे संपूर्ण खरीप पीक पाण्यात थांबल्याचे चित्र पहायला मिळाले होते.याच दमदार पावसाचा फटका आचेगाव येथील जयहिंद शुगरला बसला होता.जयहिंद शुगर्सच्या साखर गोडाऊनवरील टर्पोलिन शेडचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले होते.यामुळे गोडाऊनमधील साखर भिजून सुमारे १५ कोटी रुपयांचे नुकसान झाले. अशा अस्मानी संकटावर मात करीत जयहिंद शुगर पुन्हा एकदा ऊस उत्पादकांच्या मदतीला धावून आला आहे. पाठीमागे 'जयहिंद शुगर आपल्या दारी' या विशेष उपक्रमाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या गावा पर्यंत व घरा पर्यंत जाऊन ऊस उत्पादक शेतकऱ्यांना जयहिंद शुगर कडून सन्मानपूर्वक ऊसाचे बील अदा करण्यात आले होते.तालुक्यातील बहुसंख्य ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा ऊस हा जयहिंद शुगर कडे जाताना दिसून येत आहे.या मुळे कारखानास्थळावर उसाच्या ट्रक, ट्रॅक्टर,छकडाच्या भल्यामोठ्या रांगा पहायला मिळत आहेत.ऊस उत्पादक शेतकरी,ऊस तोड कामगार, वाहन धारक व कारखाना कामगारा मध्ये विश्वास संपादन करण्यात यंदा जयहिंद शुगर यशस्वी झाल्याचे चित्र पहायला मिळत आहे.तसेच.जयहिंद शुगर चे चेअरमन गणेश माने देशमुख व मुख्य कार्यकारी संचालक बब्रुवान माने देशमुख यांनी संपूर्ण अक्कलकोट तालुका पिंजून काढत जनसंपर्क वाढविला आहे. तालुक्यात प्रत्येक गावाला भेट देऊन सरपंच, सोसायटी चेअरमन,ग्रामपंचायत सदस्य आदी प्रतिष्ठीत गावकऱ्यांचा विश्वास संपादन करुन तालुक्यात जयहिंद शुगर चा दबदबा निर्माण करण्यात माने देशमुख परिवार यशस्वी झाले आहेत.याच बरोबर अक्कलकोट तालुक्यात भीषण पाणीटंचाई असताना अक्कलकोट शहरातील नागरिकांना पाऊस पडे पर्यंत दररोज एक लाख लिटर पाणी पुरवठा करुन जयहिंद शुगर कडून भीषण दुष्काळात माणूसकी जपण्यात आली आहे.यंदा याचाच परिणाम ऊस उत्पादक शेतकर्या वर होऊन तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा वाढता कल जयहिंद शुगर कडे दिसून येत आहे. यंदा मात्र ऊसाच्या क्षेत्रात वाढ झाल्याने जिल्ह्यातील साखर कारखाना मध्ये जणू गाळपासाठी स्पर्धाच लागल्याचे चित्र पहायला मिळत आहे.



## काळमवाडी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी जाधव बिनविरोध

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील काळमवाडी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी जय हनुमान ग्रामविकास पॅनलच्या विमल मारुती जाधव यांची बिनविरोध निवड झाली. नुतन उपसरपंच निवडीचा कार्यक्रम निवडणूक निर्णय अधिकारी चक्के यांच्या सहहयाक ग्राम सेवक कोरबु व नुतन सरपंच भुजंगराव शिंगाडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. जनतेतुन भुजंगराव शिंगाडे हे सरपंच निवडुन आले नंतर उपसरपंच निवडीकडे लक्ष लागले होते. यामध्ये ग्राम पंचायत सदस्य जगन्नाथ शिंदे, विकास देवकते, नंदा आवताडे, सुनीता इंदलकर, बळवंत आवताडे या सदस्यामधुन सर्वानुमते विमल जाधव यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी विरोधी गटाचे तिन्ही सदस्य गैरहजर राहीले. या निवडीवेळी अशोक आवताडे, तुकाराम आवताडे, नारायण देवकते, श्रीकांत आवताडे, विष्णु डाके, यशवंत शिंगाडे, राजु कोकरे, शंकर वाघमारे, लक्ष्मण शिंदे, तानाजी शिंदे, भिवा घुले, रावसाहेब इंदलकर, सुग्रीव आवताडे, दादा आवताडे, भाऊसाहेब भोसले, बंडु शिंदे, आनंदा शिंदे, शिवाजी आवताडे, संतोष वाघमारे, लक्ष्मण इरकर, ज्ञानदेव शेंडगे, दत्तु पंढरीनाथ शिंगाडे यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवडीनंतर नुतन सरपंच, उपसरपंच व सर्व सदस्यांनचा मान्यवरांच्या उपस्थितित सत्कार करण्यात आला. यावेळी माळशिरस पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पिलीव पोलीस ठाण्याचे ठाणे अंमलदार पंडीत मिसाळ, सतीश धुमाळ, अमित जाधव,अभिजीत कणसे यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

## समाजाला सकारात्मकतेकडे घेवून जाण्याचे काम पत्रकार करतात : ॲड.नाईक

**मोहोळ** : समाजाला नकारात्मक विचारातून सकारात्म विचाराकडे घेवून जाण्याच काम पत्रकार करतात असे विचार मोहोळ येथील ॲड कैलास नाईक यांनी व्यक्त केले. मोहोळ येथे जागृती युवा मंच या सामाजिक संस्थेच्या वतीने पत्रकार दिनानिमित्त पत्रकाराच्या सत्कार समारंभाचे आयोजन केले होते त्यावेळी ते बोलत होते या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड आकाश कापूरे यांनी केले यावेळी मोहोळ तालुका पत्रकार संघाचे सचिव प्रा. अशोक पाचकुडवे दर्पन पत्रकार संघाचे अध्यक्ष राजू साखरे प्रमुख उपस्थित होते. यावेळी राजकुमार शहा श्रीधर उन्हाळे अशोक कांबळे भारत नाईक मदन कुलकर्णी बालाजी शेळके महेश सोवनी संजय आठवले अविनाश पांढरे जेष्ठ पत्रकार रफीक शेख अरुण भोसले नसीर मोमीन रजनिश कसबे गो रा कुंभार यासीन आतार आदी पत्रकाराचा सन्मान करण्यात आला. यावेळी ॲड आकाश कापूरे हरी सरवदे संजय लोंढे आकाश साळवे महेश कारंडे ॲड शुभम मोटे सागर रोकडे आनंद अवचारे आदी सह युवा जागृती मंच च्या कार्यकत्यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन गणेश उघडे यांनी तर आभार हरी सरवदे यांनी मानले.



## माळीनगरात मोफत हेल्थ चेकअप शिबीर

**माळीनगर** : यशवंत बुद्धविहार संस्था माळीनगर यांच्या वतीने आणि क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त माळीनगर गेस्ट हाऊस येथे मोफत हेल्थ चेकअप शिबिर घेण्यात आले. या शिबिरात ८७ लोकांनी आपल्या शरिराची तपासणी करून घेतली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव अजित नाईकनवरे तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माळीनगरचे सरपंच अभिमान जगताप उपस्थित होते. याप्रसंगी सागर दळवी, ओंकार शिंदे, सुनीता ढगे, मोनाली कदम यांनी तपासणी व मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन पल्लवी नाईकनवरे यांनी केले. यावेळी गणेश कांबळे, विकास कांबळे अशोक लोंढे जयश्री नाईकनवरे आदी उपस्थित होते.

## पोखरापूर येथे ७७ जणांचे रक्तदान

**मोहोळ** : पोखरापूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ७७ युवकांनी रक्तदान करून सहभाग नोंदवला. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान च्या वतीने पोखरापूर येथे डॉक्टर आंबेडकर नगरातील हॉलमध्ये शौर्य दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलं होते याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते विजयकुमार चांदणे माजी सभापती यशवंत नरोटे भीम क्रांती चे संस्थापक बाळासाहेब नागटिळक ज्ञानेश्वर काळे सौरभ मोरे वंचित आघाडीचे जिल्हाध्यक्ष श्वेता ताई राजगुरू आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते या कार्यक्रमात ७७ युवकांनी रक्त दान करून करून आपला सहभाग नोंदवला या कार्यक्रमासाठी डॉ हिराचंद मोरे यांचे मार्गदर्शन लाभले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठानच्या कार्यकत्यांनी परिश्रम घेतले.

## उत्तेजक औषधे विक्रीस प्रतिबंध करण्यासाठी मोहीम घ्यावी : धैर्यशील

**सुराज्य/अकलूज**

डोपिंग व नशेच्या औषध विक्रीस आळा घालण्यासाठी महाराष्ट्रात ज्या ठीकाणी कुस्ती प्रशिक्षण केंद्र,पोलिस व सैन्य भरती प्रशिक्षण केंद्र,जीम सेंटर्स आहेत अशा शहरातील गावातील ठिकाणाच्या डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शन शिवाय अवैधरीत्या प्रतिबंधात्मक औषधविक्री करणाऱ्या मेडिकल स्टोअर्सची चौकशी करावी. सरकारने ही मोहीम तात्काळ हाती घ्यावी अशी मागणी भाजपाचे संघटन महामंत्री तथा शिवरत्न कुस्ती प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

महाराष्ट्र राज्यात इं.ज. टर्मिन, इंजे. या श्रेणीतील मेफेनटिन औषधे बेकायदेशीरपणे विकली जात आहेत. या इंजेक्शनमुळे युवक आणि क्रीडापटूंमध्ये अंमली पदार्थांचे सेवन, आक्रमकता आणि हिंसक वर्तनात चिंताजनक वाढ झाली आहे. ही औषधे डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय खुलेआम विकली जात आहेत, ती केवळ रुग्णालयात वापरण्यासाठी आहेत. त्यामुळे खेळातील खेळाडू व युवक वाया जात आहेत, सामाजिक कौटुंबिक व वैयक्तिक स्वास्थ्य बिघडत आहे.

क्रीडा प्रकारांमध्ये विशेषतः कुस्ती प्रकारात तसेच पोलीस भरतीत देखील मेफेन टेरेमिन सल्फेट



इंजेक्शनचा वापर होवू लागला आहे. सोलापूर जिल्ह्यात अवैध पद्धतीने या इंजेक्शनची विक्री केली जात असल्याचे निदर्शनास येताच सोलापूर ड्रग इन्स्पेक्टर यांच्याकडे याबाबत निवेदन दिले होते.त्या अनुषंगाने सोलापुर जिल्हा अन्न आणि औषध प्रशासनाने एक मोठी कारवाई केली आहे.

माळशिरस तालुक्यातील एकाच दुकानातून तब्बल ८००० मेफेन टरमाईन या औषधाची वाईल्सची अवैधपणे पैलवानांनाच विकल्याचे तपासात पुढे आले आहे. जर एकाट्या माळशिरस तालुक्यात एवढ्या मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीरपणे उत्तेजक व खेळातील प्रतिबंध असलेल्या औषधांची विक्री होत असेल तर संबंध महाराष्ट्रातील परिस्थिती चिंताजनक आहे. यासाठी बेकायदेशीरपणे उत्तेजक औषध विक्रिस प्रतिबंध करण्यासाठी महाराष्ट्रात मोहीम हाती घ्यावी अशी मागणी त्यांनी केली आहे.



## माळीनगरमध्ये शाळेच्या इमारतीचे उद्‌घाटन

**सुराज्य/माळीनगर**

दि सासवड माळी शुगर फॅक्टरी ची स्थापना १९३२ साली झाली. त्यावेळी परिसरातील सभासद, शेतकरी, वाड्या-वस्त्यावरील मजुरांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय होणेसाठी कारखान्याच्या तत्कालीन संस्थापक मंडळाने अंगणवाड्या सुरू करून भविष्यातील शिक्षणाचा पाया रचला. ज्यामुळे अनेक अधिकारी, नामवंत आणि सुशिक्षित नागरिक घडवण्यासाठी मोलाचा वाटा उचलल्याचे गौरवोद्गार दि सासवड माळी शुगर फॅक्टरी चे माजी मॅनेजिंग डायरेक्टर तथा दि सासवड माळी एज्युकेशन सोसायटीच्या प्राथमिक शाळा क्र. - २ चे माजी विद्यार्थी विजयकांत शंकरराव कुदळे यांनी काढले.

दि सासवड माळी एज्युकेशन सोसायटीच्या प्राथमिक शाळा क्र.२ पांढरे वस्तीच्या नुतन इमारतीचे उद्घाटन आज रविवारी ८ जानेवारी रोजी करण्यात आले.यावेळी श्री कुदळे बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कारखान्याचे माजी मॅनेजिंग डायरेक्टर अरविंद जाधव हे होते.

यावेळी कारखान्याचे चेअरमन राजेंद्र गिरमे, होलटाईम डायरेक्टर सतीश गिरमे, एज्युकेशन सोसायटीचे सचिव ॲड. सचिन बधे,संचालक अनिल रासकर, रत्नदीप बोरावके, अजय गिरमे, डॉ.अविनाश जाधव, दिलीप इनामके, कल्पेश पांढरे, पृथ्वीराज भोंगळे, संचालिका लीनाताई गिरमे,ग्रा.पं.चे सरपंच अभिमान जगताप, कारखान्याचे संचालक राहुल गिरमे, विशाल जाधव,निखिल कुदळे,महादेव एकतपुरे, मनीष रासकर, संस्थेचे सभासद विजय नेवसे, राजीव नवले,समीर पांढरे,विनय नवले,परेश नवले, प्रकाश चवरे,आशा सावंत,महादेव पाटील आदी सभासद,पालक ग्रामस्थ,संस्थेचे शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.प्रारंभी स्वागतगीत महेश शिंदे यांनी गायले.तर प्रास्ताविक मुख्याध्यापक जयसिंह कांबळे व सुत्रसंचालन वंदना एडगे यांनी केले.शेवटी ॲड.सचिन बधे यांनी आभार मानले.

## दुचाकी पळवली

**सोलापूर** : अज्ञात चोरट्याने डुप्लिकेट चावी चा वापर करत सिध्देश्वर साखर कारखाना कुंभारी येथे पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम.एच.४२.ए.डब्लू.८५३५ ही चोरून नेली आहे. याप्रकरणी विश्वनाथ नागेंद्रप्पा जाधव (वय-३२, रा. गिरिजा मंगल कार्यालय शेजारी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

## संगीताचा सूर घेऊन 'पिकोलो' प्रेक्षकांच्या भेटीला

**सुराज्य/सोलापूर**

फोर्टिंगो मोशन पिक्चर प्रा.लि प्रस्तुत आणि अभिजीत मोहन वारंग दिग्दर्शित पिकोलो' या मराठी चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. येत्या २६ जानेवारीला हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. राजेश मुद्दापूर यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. आजच्या पिढीसमोर असणारे प्रश्न, त्यांना पेलावी लागणारी आव्हानं या साऱ्याचं चित्रण करत नातेसंबंधांचे सूक्ष्म पदर संगीताच्या माध्यमातून अलगदपणे उलगडून सांगणारा पिकोलो' हा संगीतमय चित्रपट आहे. या चित्रपटाचे पोस्टर नुकतेच श्री क्षेत्र शिर्डी येथे साईबाबांच्या चरणी अर्पण करण्यात आले.



## सुळेवाडीच्या येथील घाटात युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**सुराज्य/पिलीव**

माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी घाटातील वनविभागाच्या हद्दीत मासाळवाडी तालुका माण जिल्हा सातारा येथील युवक सुरेश जालींदर नरुटे (वय २१) याने ७ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता बारातोंडीच्या झाडाला नायलॉन दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली.

यानंतर पिलीव पोलीस ठाण्याचे ठाणे अंमलदार पंडीत मिसाळ, हवालदार सतीश धुमाळ, अमीत जाधव, अभिजीत कणसे यांनी घटनास्थळी जाऊन नातेवाइकांच्या समक्ष पंचनामा करुन मृतदेह माळशिरस येथे शवविच्छेदन करण्यासाठी पाठविण्यात आला.

शवविच्छेदन केल्यानंतर रात्री मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आला. सदर युवकाने केलेल्या आत्महत्येचे कारण निश्चित समजु शकले नाही.

या घटनेचा अधिक तपास हवालदार अभिजित कणसे हे करीत आहेत. आत्महत्येचे कारण निश्चित समजले नसले तरी त्याठिकाणी सदरची आत्महत्या प्रेम प्रकरणातुन पण लग्नास नकार दिल्याने नैराशयतुन सदर युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे खाजगीत बोलले जात होते.

# एकत्र लढल्यामुळे दक्षिण तालुक्यात मोठे यश : आ. शिंदे

## निंबर्गीत परिसरातील नूतन सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांचा सत्कार

**सुराज्य/दक्षिण सोलापूर**

गत ग्रामपंचायत निवडणुकीत भाजपच्या विरोधात एकत्र लढलो त्यामुळे तालुक्यात एवढे मोठे यश मिळाले. म्हणून आता एक व्हा, आता ती वेळ आलेली आहे, आणि या एकीसाठी मी प्रयत्नशील राहणार, असे प्रतिपादन सोलापूर शहर मध्यच्या आमदार प्रणिती शिंदे यांनी केले.

काँग्रेस नेते सुरेश हसापुरे व युवा नेते गंगाधर बिराजदार यांच्या वतीने शुक्रवारी संध्याकाळी

निंबर्गी व पंचक्रोशीतील नूतन सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



स्वागत गंगाधर बिराजदार यांनी केले. माजी आमदार दिलीप माने म्हणाले, दक्षिण सोलापूर तालुक्यात राजकारणात आम्ही सर्व नेते विचाराने राहिलो ,पण मनाने एकच होतो. शेवटी याचा त्रास सर्वांना झाला हे विसरून चालणार नाही, यापुढे आपण सर्वजण झाले गेले विसरून तालुक्याच्या विकासासाठी आणि जनतेच्या हितासाठी एकत्र येऊन काम करू या. आमदार सिध्दाराम म्हेत्रे म्हणाले, आपल्या गावचा विकास करायचे असेल, तर सर्वत्र काँग्रेसची सत्ता येणे गरजेचे आहे. ग्रामस्थांचे हित डोळ्यासमोर ठेवून काम करावे, असे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला उशीर झाल्याने सुरेश हसापुरे यांनी आपले जास्त भाषण टाळले.

या कार्यक्रमाला काँग्रेसचे नूतन शहाराध्यक्ष चेतन नरोटे, माजी नगरसेवक बाबा मिस्त्री, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष हरीश पाटील, दादा कोरे कोरे, बाजार समितीचे माजी उपसभापती चंद्रकांत खुपसंगे, काँग्रेसचे युवा नेते अनंत म्हेत्रे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऐश्वर्या हिंबारे यांनी तर आभार नूतन सदस्य अरुण बिराजदार यांनी मानले.

### शिंदे-म्हेत्रे-माने नेतृत्वाखाली काम करणार

दक्षिण सोलापूर तालुक्यात परिवर्तन घडवून आणण्यासाठी आमदार प्रणिती शिंदे, माजीमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, माजी आमदार दिलीप माने यांच्या नेतृत्वाखाली काम करणार आहे. सत्ता असो वा नसो आपण शब्द दिल्याप्रमाणे काम करणार आहे. आजपर्यंत सर्व गावांसाठी निधी खेचून आणून काम करत आलो आहे. ग्रामपंचायत निवडणूकीत विजय झालेल्या सर्व सरपंच, उपसरपंच आणि सदस्यांना यापुढे कोणताही निधी कमी पडू देणार नाही. आमच्या नेत्यांकडून प्रयत्न करून निधी आणू.आपण आमदार शिंदे, माजी वमंत्री म्हेत्रे, माजी आमदार माने यांच्या नेतृत्वाखाली या पुढील आपली वाटचाल राही.

**-सुरेश हसापुरे (कार्याध्यक्ष काँग्रेस सोलापूर जिल्हा)**

# एका आठवड्यात ७५ कोटींचे अंमलीपदार्थांची जप्ती

## मुंबई विमानतळावर सीमा शुल्क विभागाची मोठी कारवाई





सुराज्य/नवी दिल्ली

**नवीन वर्षाच्या पहिल्याच आठवड्यात मुंबई विमानतळावर ७५ कोटी रुपयांचे अंमलीपदार्थ जप्त करण्यात सीमाशुल्क विभागाला यश आले आहे. तीन विविध कारवायांमध्ये सुमारे साडेचार किलो कोकेन व साडेचार किलो हेरॉईन जप्त करण्यात आले. आफ्रिकी देशांमधून या अंमलीपदार्थांची तस्करी करण्यात आली होती.**

सीमाशुल्क विभागाने मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज विमानतळावर शुक्रवारी सुमारे २८ कोटी रुपये किंमतीचे तीन किलो कोकेन जप्त केले. याप्रकरणी उत्तराखंडमधील रहिवाशाला अटक करण्यात आली आहे. देवकी पांडे असे अटक आरोपीचे नाव असून आरोपीला इथोपियाची राजधानी असलेल्या अदिस अबाबा येथे अंमली पदार्थ देण्यात आले होते. दिल्लीतील एका व्यक्तीला हे कोकेन द्यायचे होते, असे पांडेने चौकशीत कबुल केल्याचे सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

संशयीत प्रवासी अंमलीपदार्थ घेऊन येणार असल्याची माहिती सीमाशुल्क विभागाच्या हवाई गुप्तवार्ता विभागाला (एआययू) मिळाली होती. त्यानुसार मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज विमानतळावर सापळा रचण्यात आला होता. संशयीत आरोपी विमानतळावर आल्यानंतर त्याला ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर त्याच्याकडील काळ्या रंगाच्या बॅगेची तपासणी करण्यात आली. बॅगेमध्ये एका पारदर्शक पिशवीमध्ये मोठ्या चतुराईने अंमली पदार्थ लपवण्यात आल्याचे निदर्शनास आले. त्याच्याकडून २८०० ग्रॅम पांढऱ्या रंगाची भुकटी जप्त करण्यात आली. तपासणीत ते कोकेन असल्याचे निष्पन्न झाले. आंतरराष्ट्रीय बाजारात या कोकेनची किंमत २८ कोटी रुपये आहे. नंतर सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या चौकशी अदिस अबाबा येथे अनोळखी व्यक्तीने त्याला अंमली पदार्थ दिल्याचे निष्पन्न झाले. त्याला ते दिल्लीतील एका व्यक्तीला देण्यास सांगण्यात आले होते. पण त्यापूर्वीत त्याला अटक झाली. याप्रकरणी पांडेविरोधात अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा सिद्ध झाल्यास १० ते २० वर्षांची शिक्षा होऊ शकते. तस्कराकडील अंमली पदार्थ विक्रेत्यांकडे पोहोचवण्याचे काम पांडेला देण्यात आले होते. अशाच प्रकारे आरोपीने यापूर्वीही परदेशवारी केली आहे का याबाबत सीमाशुल्क विभाग अधिक तपास करीत आहे.

सीमाशुल्क विभागाने गुरुवारी विमानतळावरून १५९६ ग्रॅम कोकेन जप्त केले होते. त्याप्रकरणी दिल्लीतील रहिवाशाला अटक करण्यात आली होती. सीमाशुल्क विभागाने ४८ तासांमध्ये विमानतळावरून ४४ कोटी रुपयांचे कोकेन जप्त केले आहे. याशिवाय आणखी एका कारवाईत साडेचार किलो हेरॉईन जप्त करण्यात आले होते. त्याप्रकरणी हैदराबादमधील रहिवाशाला अटक करण्यात आली होती. त्याच्याकडून जप्त करण्यात आलेल्या हेरॉईनची किंमत ३१ कोटी रुपये होती. नवीन वर्षाच्या पहिल्याच आठवड्यात सीमाशुल्क विभागाने विमानतळावरून ७५ कोटी रुपयांचे अंमलीपदार्थ जप्त केले आहे.

# साखरझोपेत असताना हिंगोली भूकंपाने हादरले

## ४० ते ५० गावांमध्ये जाणवले हादरे



सुराज्य/हिंगोली

**जिल्ह्यातील वसमत, औंढा नागनाथ व कळमनुरी तालुक्यातील सुमारे ४० ते ५० गावांमध्ये रविवारी पहाटे भूकंपाचा सौम्य धक्का बसला. पहाटे ४.३० वा. हा भूकंपाचा धक्का बसला. या भूकंपाची तीव्रता ३.६ रिश्टर स्केल एवढी होती, अशी माहिती जिल्हा प्रशासनाच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षातर्फे देण्यात आली आहे. तसेच, नॅशनल सेंटर फॉर सिसमोलॉजीतर्फेही या भूकंपाची तीव्रता ३.६ रिश्टर स्केल एवढी असल्याचे सांगण्यात आले आहे.**

हिंगोली जिल्ह्यात विशेषत वसमत, कळणनुरी व औंढा नागनाथ तालुक्यात मागील ८ ते १० वर्षांपासून जमिनीतून आवाज येण्याचे प्रकार होत आहेत. भूगर्भातील सूक्ष्म हालचालींमुळे हे आवाज येत असल्याचे प्रशासनाकडून सांगितले जात आहे. औंढा नागनाथ तालुक्यातील पिंपळदरी, राजदरी, सोनवाडी, आमदारी, कंजारा, पुर, वसई, जामगव्हाण, जलालदाभा, काकडदाभा, वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे, वापटी, कळमनुरी तालुक्यातील बोथी, दांडेगाव, सिंदगी, बोल्डा, असोला आदी प्रमुख गावांमध्ये भुकंपाचा धक्का जाणवला आहे.

दरम्यान, रविवारी पहाटे झालेल्या या भूकंपाची ३.६ रिश्टर स्केल एवढी नोंद झाल्याचे जिल्हा प्रशासनाच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्यावतीने सांगण्यात आले आहे. या भूकंपाच्या धक्क्यामुळे कुठेही नुकसान झाले नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. नागरिकांनी घाबरून जाऊ नये, कुठल्याही प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्यासाठी प्रशासन सज्ज असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# मुख्यमंत्री आणि पंतप्रधानांची निवडही जनतेतून व्हावी

## अजित पवारांची मोठी मागणी



सुराज्य/मुंबई

जनतेतून थेट सरपंच निवडल्याने अनेकदा गोंधळ होतो. सरपंच आणि ग्रामपंचायतींचे सदस्य हे वेगळ्या विचाराचे असले की ते एकमेकांच्या निर्णयाला विरोध करतात. या भांडणातून ग्रामपंचायतींचा खेळखंडोबा होतो. तुम्ही जर सरपंच थेट जनतेतून निवडून देणार असाल, तर नगराध्यक्ष, महापौर, मुख्यमंत्री आणि पंतप्रधानांची निवडही जनतेतून व्हावी, अशी मागणी राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केली आहे. कोल्हापूरमध्ये अजित पवारांच्या हस्ते नवनियुक्त सरपंचांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता, यावेळी ते बोलत होते.

'तुम्हांला नवीन संधी मिळाली आहे. तुम्ही थेट लोकांमधून निवडून आला आहात. ज्यावेळी थेट जनतेतून सरपंच निवडण्याचा ठराव झाला, तेव्हा आम्ही त्याला विरोध केला होता. जर तुम्ही सरपंच थेट जनतेतून निवडून देणार असाल तर नगराध्यक्ष, महापौर, मुख्यमंत्री आणि पंतप्रधानांची निवड सुद्धा जनतेतून व्हावी, एका ठिकाणी एक पद्धत आणि दुसऱ्या ठिकाणी दुसरी पद्धत हे योग्य नाही, अशी आमची भूमिका होती, अशी प्रतिक्रिया अजित पवार यांनी दिली.'

जनतेतून थेट सरपंच निवडल्याने अनेकदा गोंधळ होतो. सरपंच आणि ग्रामपंचायतींचे सदस्य हे वेगळ्या विचाराचे असले की ते एकमेकांच्या निर्णयाला विरोध करतात. या भांडणातून ग्रामपंचायतींचा खेळखंडोबा होतो. त्यामुळे माझी सरपंचांना विनंती आहे, की त्यांनी सर्वांना बरोबर घेऊन काम केले पाहिजे. त्यातून गावाचा विकास करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असेही ते म्हणाले.

## व्यवसाय करण्याचे धाडस नाही : पाटील

सुराज्य/पुणेः 'मराठी माणूस हा शिक्षण झाल्यास नोकरीला प्राधान्य देतो. व्यवसाय करण्याचे तो धाडस करत नाही. मराठीचा टक्का व्यवसाय आणि राजकारणात कमी झाला आहे, असे मत पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले आहे. ते पिंपरी-चिंचवडमध्ये आयोजित १८व्या जागतिक मराठी संमेलनात बोलत होते.' यावेळी मंत्री सुधीर मुनगंटीवार, डॉ. पी. डी. पाटील, संमेलनाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर मुळे आदी मान्यवर उपस्थित होते.

चंद्रकांत पाटील यांनी मराठी टक्का आणि मराठी माणसाविषयी चिंता व्यक्त केली आहे. मराठी माणूस शिक्षण घेतल्यावर नोकरीला प्राधान्य देतो.

# अदानींनी विरोधकांना दिले उत्तर



सुराज्य/नवी दिल्ली

**गौतम अदानी यांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी जवळचे संबंध असून पंतप्रधान मोदी हे अदानींच्या फायद्याचे निर्णय घेतात, असा आरोप विरोधकांकडून सातत्याने केला जातो. दरम्यान, या आरोपावर आता स्वतः गौतम अदानी यांनी प्रतिक्रिया दिली आहे.**

**अदानी समूहाचे उद्योग देशातील २२ राज्यात असून सर्व ठिकाणी भाजपाचे सरकार नाही, असे ते म्हणाले. विरोधकांचे आरोप निराधार आहेत. आम्हांला देशातील प्रत्येक राज्यात गुंतवणूक करायची आहे.**

अदानी समूहाने २२ राज्यांमध्ये गुंतवणूक केली आहे. यापैकी अनेक राज्यं भाजपाशासित नाहीत. डाव्यांचा गढ मानल्या जाणाऱ्या केरळ तसेच पश्चिम बंगाल, ओडीस इथेही आमचे उद्योग आहेत. महत्त्वाचे म्हणजे आम्हांला यापैकी कोणत्याही राज्यात उद्योग करताना समस्या जाणवल्या नाहीत, अशी प्रतिक्रिया गौतम अदानी यांनी दिली. तसेच पंतप्रधान मोदींकडून तुम्हाला कधीही वैयक्तिक फायदा मिळू शकत नाही. तुम्ही त्यांच्याशी विविध धोरणांविषयी चर्चा करू शकता. मात्र, जेव्हा एखादे धोरण तयार केले जाते, तेव्हा ते सर्वांसाठी असते. केवळ अदानी समूहासाठीच नाही, असेही ते म्हणाले.

पुढे बोलताना त्यांनी अदानी समूहाबद्दल गैरसमज पसरवला जात असल्याचीही प्रतिक्रिया दिली. मागील काही दिवसांत विरोधकांकडून आरोप करण्यात आला आहे की, 'आम्ही बँकांकडून मोठ्या प्रमाणात कर्ज दिले जात आहे. मात्र, गेल्या काही वर्षात आमचे उत्पन्न २४ टक्क्यांनी वाढले आहे आणि कर्ज ११ टक्क्यांनी वाढले आहे. आमची एकूण संपत्ती कर्जाच्या चौपट आहे, असे ते म्हणाले.

# पाकिस्तानमध्ये आर्थिक संकट गंभीर

सुराज्य/कराची : पाकिस्तानच्या डोक्यावरील कर्जाचा बोजा दिवसेंदिवस वाढत चालला आहे. पाकिस्तानात पीठ, तेल, कांदा आणि डाळी यांसारख्या खाद्यपदार्थांचे दर गगनाला भिडले आहेत.

सध्या मोठ्या आर्थिक संकटात अडकला आहे. पाकिस्तानमध्ये खाण्यापिण्याचे गंभीर संकट निर्माण झाले आहे. पाकिस्तानात पीठ, तेल, कांदा आणि डाळी यांसारख्या खाद्यपदार्थांचे दर गगनाला भिडले आहेत. महागाई इतकी वाढली आहे की लोक दोन अन्नासाठी तडफडताना दिसत आहेत. पाकिस्तानवरील वाढते कर्ज, पेट्रोल-डिझेल आणि विजेच्या वाढत्या किमती, घटत चाललेला परकीय चलन साठा, जागतिक चलनवाढ, राजकीय अस्थिरता आणि जीडीपीच्या वाढीतील मंदी या सर्व समस्यांना तोंड देण्यासाठी पाकिस्तानला कठोर संघर्ष करावा लागत आहे. पंतप्रधान शेहबाज शरीफ यांच्या नेतृत्वाखालील सरकारने शॉपिंग मॉल आणि बाजारपेठा रात्री ८:३० नंतर बंद करण्याचे आदेश दिले आहेत. वीजेचा साठाही संपुष्टात येताना दिसत आहे.

# बिहारमध्ये जातनिहाय जनगणनेस आरंभ

## केंद्र सरकारची तयारी नाही, मात्र आमचा पुढाकार : नितीशकुमार



सुराज्य/पाटणा

**बिहारमध्ये वैशाली जिल्ह्यातून शनिवारपासून जातनिहाय जनगणनेला सुरुवात करण्यात आली. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी या जातनिहाय जनगणनेबाबत सांगितले की, केंद्र सरकार त्यासाठी तयार नसताना राज्य सरकार आपल्या स्तरावर अशाप्रकारे जनगणना करत आहे. आपल्या समाधान यात्रेचा एक भाग म्हणून मुख्यमंत्री वैशाली जिल्ह्यातील गोरौल गटांतर्गत हरसेर गावात मनोज पासवान यांच्या घरी पोहोचले. पासवान यांच्या घरातून जातनिहाय जनगणनेला सुरुवात करण्यात आली.**

यावेळी नितीशकुमार यांनी मनोज पासवान आणि जातनिहाय मतमोजणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना नितीशकुमार यांनी सांगितले की, या जनगणनेचे काम चांगले सुरू झाले आहे. आपण स्वत: ते पाहिले आणि प्रगणकांना सर्व काही व्यवस्थित नोंदवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जर एखाद्या व्यक्तीचे घर येथे असेल मात्र, ती राज्याबाहेर राहत असेल तर त्याची माहिती घेण्याची सूचना देण्यात आली आहे. सर्व पक्षांच्या सहमतीने जातनिहाय जनगणनेचे काम सुरू झाले आहे.

# पुण्यात राज यांची तुफान फटकेबाजी



सुराज्य/पुणे

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे आपल्या हटक्या शैलीतून सातत्याने राजकीय परिस्थितीवर प्रहार करत असतात. मला जे पटतं तेच मी बोलतो असं म्हणत त्यांनी महाविकास आघाडीवर टीकास्त्र सोडलं आहे. एवढंच नव्हे तर पहाटेच्या शपथविधीवरूनही त्यांनी निशाणा साधला आहे. पुण्यात आयोजित केलेल्या १८ व्या विश्व मराठी संमेलनात त्यांनी विविध विषयांवर बिंधास्त आणि दिलखुलास मते मांडली.**

राज ठाकरे म्हणाले की, 'एखाद्या भूमिकेला विरोध करणं राजकारणात काहीच गैर नसतं. पण, जर त्या माणसाने काही चांगली कामं केली की त्याचं अभिनंदन करण्याचा मोठेपणा आणि मोकळेपणा आपल्यात असायला पाहिजे. २०१९ नंतर कलम ३७० रद्द होणं, रामजन्मभूमीचा विषय मार्गी लागलणं, अशा अनेक गोष्टी सरकारकडून झाल्या. म्हणून त्यांना चांगलं बोललो. पण आपल्याकडे विरोध म्हणजे विरोध. चांगलं बोलायचंच नाही. मी भूमिका बदलतो असं तुम्ही म्हणता. मग अडीच वर्षांपूर्वी एकमेकांना शिव्या घालणारे आज मांडीला मांडी लावून बसले आहे, त्यांना तुम्ही का बोलत नाही, असा सवाल राज ठाकरेंनी उपस्थित केला. यावेळी त्यांनी पहाटेच्या शपथविधींवरूनही टोला लगावला.'

सकाळी ६ वाजता जाऊन शपथ घ्यायची राज्यपालांकडे. परत त्यांच्याच विरोधात बसायचं, मग त्यांच्याशींच गोड गोड बोलायची. मीं जरा व्यंगचित्रकाराच्या भाषेतच बोलतो. 'मी बैलासारखं मुतत माझा विचार नाही करत. बैल चालता चालता मुततो, असं राज ठाकरे म्हणाले.' अर्थात त्यांचा हा रोख नक्की कोणावर होता हे राजकीय वर्तुळातील लोकांना वेगळं सांगायची गरज नाही.

# अमेरिकेत सुपरबग बॅक्टेरियाचा धोका

सुराज्य/वॉशिंग्टन : अमेरिकेमध्ये वेगाने पसरणाऱ्या एका सुपरबगने संपूर्ण जगाला चिंतेत टाकले आहे. या सुपरबगचे नाव मायकोप्लासमा जेनिटेलियम असे आहे. या सुपरबगमुळे मानवाला लैंगिक संक्रमित रोग (STI) होतात, ज्यामुळे वंध्यत्व येऊ शकते. सुपरबग हा साधारणपणे बॅक्टेरियाचे एक प्रकार असतो.

मानवी शरीरात अनेक जीवाणू म्हणजे बॅक्टेरिया असतात. काही बॅक्टेरिया हानिकारक नसतात आणि काही अत्यंत धोकादायक असतात. या सुपरबगचे नाव मायकोप्लाझ्मा जेनिटालियम आहे. हे इतके धोकादायक आहे की आतापर्यंत जे काही अँटीबायोटिक उपचारासाठी वापरले जाते, ते सर्वांविरुद्ध प्रतिकारशक्ती निर्माण करते. त्यामुळे डॉक्टरांनाही उपचार करणे कठीण होत आहे.

# राणे लवकरच राज्यपाल



सुराज्य/मुंबई

राज्याच्या राजकारणातील 'खणखणीत नाणे' अशी ओळख असलेले केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचे मंत्रीपद येत्या काळात जाणार असून लवकरच त्यांची पूर्वेतील एका राज्याच्या राज्यपालपदावर वर्णी लागणार असल्याचे विश्वसनीय सूत्रांकडून समजते. नारायण राणे यांचे मंत्रीपद जाणार असल्याचा दावा शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी केल्यानंतर याबाबत राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. याबाबत अनेकांकडून तर्क-वितर्क लढविण्यास सुरुवात झाली असून या महिनाअखेरीस होणाऱ्या तिसऱ्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या विस्तारानंतर पूर्वोत्तर राज्यात राणेंची राज्यपालपदी नियुक्ती होणार आहे.

१ फेब्रुवारी रोजी केंद्रीय अर्थसंकल्प जाहीर होणार आहे. त्याआधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारचा अखेरचा मंत्रिमंडळ विस्तार मार्गी लागणार असल्याची माहिती आहे. जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत मोदी सरकार हा विस्तार मार्गी लावण्यास उत्सुक आहे, परंतु या विस्तारादरम्यान नारायण राणे यांचे मंत्रीपद काढून घेण्यात येणार असल्याचा दावा संजय राऊतांचा आहे. महाराष्ट्रात सत्तांतर झाल्यानंतर राष्ट्रीय लोकशाही आघाडीत (एनडीए) सामील झालेल्या बाळासाहेबांची शिवसेनेतील (शिंदे गट) काही जणांची मंत्रीपदावर वर्णी लागणार असल्याची माहिती आहे.

# १९९३ च्या बॉम्बस्फोट मालिकेची पुन्हा धमकी

सुराज्य/मुंबई

**मुंबई पुन्हा एकदा बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणारा फोन मुंबई पोलिसांच्या कंट्रोल रूममध्ये पुन्हा एकदा खणाणला आहे. पुढच्या दोनच महिन्यांत मुंबईत १९९३ सारखे स्फोट होणार, अशी धमकी देणारा फोन मुंबई पोलिसांच्या कंट्रोल रूमला आला आहे. तसेच, मुंबईतील गजबजलेली ठिकाणं म्हणजेच, माहीम, भेंडी बाजार, नागपाडामध्ये बॉम्बस्फोट होण्याचा दावा या फोनवर करण्यात आला आहे. महत्त्वाची बाब म्हणजे, बॉम्बस्फोट घडवण्यामागे एका काँग्रेस आमदाराचा हात असल्याचेही या फोनवर सांगण्यात आले आहे. दरम्यान, मुंबई एटीएसने हा फोन ज्या व्यक्तीने केलाय त्या व्यक्तीला ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी सखोल चौकशी सुरू आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई पोलिसांच्या कंट्रोल रूममध्ये शनिवारी फोन केला होता. फोन करणाऱ्यानं पुढच्या दोन महिन्यांतच मुंबईत १९९३ सारखे स्फोट होणार असल्याचा दावा केला. मुंबईच्या माहिम, भेंडीबाजार, मदनपुरा आणि नागपाडामध्ये बॉम्बस्फोट होणार असून यामागे एका काँग्रेस आमदाराचा हात असल्याचेही धमकी देणाऱ्याने सांगितले होते. त्याचप्रमाणे १९९३ साली मुंबईत दंगल उसळली होती. तशीच दंगल आताही होणार असल्याचेही या फोनवरुन सांगण्यात आले होते.




एवढेच नाहीतर काही वर्षांपूर्वी देशाला दादरवणारी घटना दिल्लीत घडली होती. ती घटना म्हणजे, निर्भया प्रकरण. अशीच घटना पुढच्या दोन महिन्यांत मुंबईतही होणार असल्याचेही या फोनवर बोलणाऱ्या व्यक्तीने सांगितले होते. मुंबईत बॉम्बस्फोट, दंगली घडवण्यासाठी दुसऱ्या राज्यातून लोक आली असून यामागे एका काँग्रेसच्या आमदाराचा हात असल्याचेही फोनवरुन बोलणाऱ्या व्यक्तीने म्हटले होते.

मुंबई एटीएस मुंबई क्राईम ब्रांच आणि सीआययूची टीम आरोपीच्या मागे लागली होती. फोन करणाऱ्या व्यक्तीचा कसून शोध सुरू होता. अशातच मुंबई एटीएसला एक सुगावा लागला. त्यानंतर तपासाची सूत्र अधिक वेगाने फिरवत मुंबई एटीएसने आरोपीला मुंबईतील मालाड परिसरातून ताब्यात घेतले. सध्या या प्रकरणाची कसून चौकशी सुरू आहे.




# काडादी ‘धर्म’ तर मालक ‘कर्म’ संकटात

**दीपक शेळके**

**सोलापुरातील आ.विजय देशमुख (मालक) आणि धर्मराज काडादी या दोन घराण्यांमधील संघर्ष आता शिगेला पोहचला आहे. देशमुख यांना मैदानात येण्याचे आव्हान देवून काडादींनी चक्क देशमुख यांच्या विरोधात दंड थोपटले. ‘तुम्ही आगामी निवडणुकीत तिकीट मिळवून दाखवा’ असे उघड आव्हान देत राजकीय आखड्यात म्हणजेच शहर उत्तर विधानसभा मतदारसंघात उतरण्याची जणू आगाहीच काडादींनी दिल्याने सोलापूरचे राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे.**

राजकारणात प्रवेश केल्यास कारखान्याच्या आणि समाजाच्या संस्थांमध्ये अडचणी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे मालकांच्या विरोधात थेट निवडणुकिच्या आखड्यात उतरायचे कि,सर्व पक्षांसोबत जिव्हाळ्याचे संबंध ठेवून आपली सामाजिक वाटचाल कायम ठेवत मालकांच्या विरोधात विरोधकांना रसद पुरवायची अशा ‘धर्म’ संकटामध्ये काडादी तर काडादींना आव्हाने दिल्याने देशमुख हे ‘कर्म’ संकटात सापडल्याची चर्चा आहे.

शहरातील राजकिय पंडितांचे लक्ष सध्या शहर उत्तर विधानसभा मतदारसंघावर केंद्रीत झाले आहे. साऱ्यांच्या नजरा काडादी आणि देशमुख परिवाराभोवती फिरत आहे. शहर उत्तर विधानसभा मतदारसंघ हा तसा पाहायला गेला तर बहुभाषिक मतदारसंघ. लिंगायत समाजाचे प्राबल्य असले तरी पद्मशाली, मराठा, मुस्लिम धनगर, दलित समाजाची मते आतापर्यंत निर्णायक ठरली आहेत. हा सर्व समाज भाजपाच्या म्हणजे मालकांच्या मागे गेली वीस वर्षे ठामपणे उभे राहिला आहे. या मतदारसंघात भारतीय जनता पार्टीचा कोणताही कार्यकर्ता उभारला तरी तो विजयी पताका फडकवणारच, असे बोलले जाते. अडीच लाखांच्या आसपास मतदारसंख्या असेलल्या या मतदारसंघातून देशमुख यांनी सलग चार टर्म भाजपचा झेंडा रोवला आहे. २००९ मध्ये देशमुख, कोठे. सपाटे यांच्या तिरंगी लढत नंतर सक्षम विरोधक नसल्यामुळे विजय मालकांसमोर कोणाचा निभाव लागला नाही. २००४ मध्ये विश्वनाथ चाकोते. तर २०१४ मध्ये गादेकर, चाकोते तर २०१९ मध्ये सपाटे, गावडे, चंदनशिवे, व्यास, यांचा पराभव करत विक्रमी एक लाखांपेक्षा जास्त मताधिक्य घेऊन मालक विजयी झाले.

प्रत्येक निवडणुकित लिंगायत समाज आणि भाजपातील मालकांचा विरोधी गट सक्रिय होतो. मतदारसंघातील मालकशाहीच्या विरोधात उठाव केला जातो. उमेदवार बदलण्याची मागणी केली जाते मात्र आतापर्यंत मालकांना पर्याय मिळला नाही. त्यामुळे भाजपातील बंड पेल्यातील वादळ ठरले आहे.

मात्र यंदा परिस्थिती वेगळी आहे. ज्यांनी बाजार समिती असो, साखर कारखाना असो. अथवा विधानसभेची निवडणूक असो. अशा प्रत्येकी वेळी मालकांना साथ केल्याचा दावा केलेल्या काडादी यांनीच मालकांना आव्हान दिले आहे. त्याशिवाय सर्व पक्षीय लोकप्रतिनिधी, शेतकरी, समाज बांधव यांचा मोठा पाठिंबा काडादींना मिळत असल्याचे चित्र आहे. मात्र, राजकीय पटलावर पड्याआड राहून भूमिका वठवलेले काडादी हे खरोखरच राजकिय आखड्यात उतरणार का ?





निवडणुकीच्या आखाड्यात उतरायचे की, सर्व पक्षांसोबत जिव्हाळ्याचे संबंध ठेवून आपले सामाजिक वाटचाल कायम ठेवत ‘विजय मालकां’च्या विरोधकांना रसद पुरवायची असा प्रश्न काडादी यांच्यासमोर आहे. त्याची कारणे देखील तशीच आहेत.मालकांनी जर काडादींच्या संस्थांना

ठाम राहाणार का ? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

### आ. विजयकुमार मालकांच्या जमेच्या बाजू

- पालिकेत सत्ता आणण्याची धमक
- शहर उत्तर मतदार संघात जास्त नगरसेवक निवडून आणण्याची ताकत
- सर्व राजकीय पक्षातील स्थानिक नेते मंडळींचा असलेले घरोबा
- लिंगायत समाजसह विरिष्ठ पातळीवरील नेते मंडळीचा पाठिंबा
- नगरसेवकांच्या माध्यमातून कोट्यवधींचा निधी देऊन प्रभागाचा विकास

जाहीर केलेल्या आपल्या राजकीय भूमिकेवर

समाजाच्या संस्थांना मालकांनी जाणून बुजून त्रास दिला त्यामुळे आपण आता समाजाच्या संस्था वाचवण्यासाठी आणि विजयमालकांना राजकीय क्षेत्रापासून दूर ठेवण्यासाठी जी काही राजकीय पावले उचलावी लागतील ते आपण उचलणार,असे काडाडी हे पत्रकार परिषदेत म्हणाले मात्र निवडणुकीच्या वेळी काय परिस्थिती असेल त्यावर आपला निर्णय राहील, या त्यांच्या विधानाने मोठा संभ्रम देखील निर्माण केला आहे. त्यामुळे राजकारणात मालकांच्या विरोधात निवडणुकीच्या आखाड्यात उतरल्यास ज्या संस्था वाचवण्यासाठी दंड थोपटले त्या संस्थांचा त्रास काढणार हे सांगायला कोण्या ज्योतिषाची गरज नाही. त्यामुळे मालकांच्या विरोधात थेट

### धर्मराज काडदी यांच्या जमेच्या बाजू

- सुवर्ण देवस्थानच्या माध्यमातून लिंगायत समाजामध्ये वजन
- कारखान्याच्या माध्यमातून हजारो तरूणांच्या हाताला काम
- शिक्षण संस्थाच्या माध्यमातून दर्जे दार शिक्षण रोजगार उपल्बध
- कारखान्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिलासा

विरोध केला असेल तर तेही या कर्म संकटात असतील.पण तमाम मतदारच त्याचा फैसला करतील.

# शिंदे-माने-हसापुरे यांचा ‘मिले सूर मेरा तुम्हारा’

## आगामी सर्व निवडणुकीत राहणार का? ‘हा नारा’

**अजित उंब्रजकर**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील निम्बर्गी येथे महाआघाडीतून निवडून आलेल्या सरपंचांनी उपसरपंचांचा सत्काराचा कार्यक्रम पार पाडला. त्याला आमदार प्रणिती शिंदे, माजी आमदार सिद्धाराम म्हेत्रे, दिलीप माने यांच्यासह माजी जि.प. सदस्य सुरेश हसापुरे उपस्थित होते. या कार्यक्रमात सर्व नेत्यांनी ‘मिले सूर मेरा तुम्हारा’चा राग आवळल्याचे दिसून आले. या नेत्यांनी आळवलेला हा राग आगामी काळात येणाऱ्या सर्व निवडणुकींपर्यंत टिकणार की पुन्हा एकदा हेच नेते एकमेकांवर कुरघोडी करणार याची चर्चा दक्षिण तालुक्यात सुरू झाली आहे.







निम्बर्गी येथे झालेल्या या महत्त्वाच्या राजकिय कार्यक्रमांमध्ये आमदार प्रणिती शिंदे यांनी हे यश एकजुटीमुळे मिळाले आहे, मी आता या नेत्यांमध्ये फूट पडू देणार नाही, असे सांगितले तर माजी आमदार दिलीप माने यांनी एकमेकापासून दूर गेलो असलो तरी मनाने एकच आहोत असे सांगत एकत्र राहण्याचे संकेत दिले आहेत. माजी आमदार सिद्धाराम म्हेत्रे यांनी स्वतःच्या अनुभवावरून कार्यकर्त्यांना काहीही करून सांभाळा, असा सल्ला उपस्थित नेत्यांना दिला. हसापुरे यांनी आमदार प्रणिती शिंदे आणि माजी आमदार दिलीप माने यांच्या मार्गदर्शनाखाली काम करू असे जाहीर केले आहे तर काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी अशीच एकी दाखवा म्हणजे तीन आमदार पुन्हा दिसतील अशी अपेक्षा व्यक्त केली.

वास्तविक पाहता या व्यासपीठावर उपस्थित असलेल्या नेत्यांना भाजपने चांगला धक्का दिला आहे. दिलीप माने यांचा पराभव आमदार सुभाष देशमुख यांनी करून त्यांना दक्षिण सोडायला भाग पाडले तर सिद्धाराम म्हेत्रे यांचा भाजपच्याच नवख्या सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडून त्यांचा पराभव झाला आहे तर दुसरीकडे सुशीलकुमार शिंदे यांना सलग दोनदा भाजपनेच पराभवाची धूळ चारली आहे. दुसरीकडे मागील जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये सुरेश हसापुरे यांचा कुंभारीमधूनच भाजपच्या उमेदवारानेच पराभव केलेला आहे. त्यामुळे सध्या हे सर्व नेते भाजपच्या विरोधात एकत्र येण्याचे आवाहन करत आहेत. सध्या तरी एकत्र आलेले हे नेते आगामी येणाऱ्या जिल्हा परिषद महापालिका आणि विधानसभा निवडणुकित असेच एकी दाखवणार का? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित झालेला आहे. कारण गत निवडणुकीमध्ये दिलीप माने यांनी आमदार प्रणिती शिंदे यांच्या विरोधात निवडणूक लढवली होती तर २०१४ मध्ये सुरेश हसापुरे यांनी दिलीप माने यांच्या विरोधात निवडणूक लढवली होती. आताही अशीच काही परिस्थिती निर्माण होते का अशीही चर्चा तालुक्यात सुरू झाली आहे.

> **... तर मग सगळ्यांचीच गोची होणार**
>
> सध्या विचित्र आणि चमत्कारिक परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळेच अधून मधून सोलापूर लोकसभेसाठी भाजपकडून आमदार प्रणिती शिंदे यांचे नाव चर्चेला येत आहे. आमदार प्रणिती शिंदे आणि काँग्रेसकडून या वृत्ताची जोरदार खंडन होत असले तरी राजकारणात काहीही घडू शकते, असा जर कयास केला तर निम्बर्गीच्या व्यासपीठावर एकत्र आलेल्या सर्वच नेत्यांची गोची होण्याची शक्यता आहे.

सध्या दक्षिणचे नेतृत्व काँग्रेसकडून सुरेश हसापुरे करत आहेत. संपूर्ण दक्षिण सांभाळण्याची जबाबदारी सुशीलकुमार शिंदे आणि आमदार प्रणिती शिंदे यांनी त्यांच्यावर दिली आहे. सोसायटी निवडणुका आणि ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये त्यांनी यामध्ये यशही मिळवले आहे. त्यामुळे त्यांना आगामी काळात विधानसभेला उमेदवारी मिळेल अशी अपेक्षा हसापुरे आणि त्यांच्या समर्थकांना लागली आहे. अशातच सध्या दिलीप माने हे राष्ट्रवादीच्या वाटेवर आहेत आणि त्यांनी दक्षिण मधूनच विधानसभा निवडणूक लढवण्याची घोषणा केलेली आहे जर महाआघाडीतून ही जागा माने यांच्या रूपाने राष्ट्रवादीकडे गेली तर सुरेश हसापुरे काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

त्यामुळे विधानसभा निवडणुकीपूर्वी हसापुरे यांचे पुनर्वसन होणे जिकरीचे बनणार आहे.

सुरेश हसापुरे यांच्यासाठी जिल्हा परिषद आणि बाजार समितीचा पर्याय उपलब्ध आहे. मात्र गतवेळी या दोन्ही निवडणुकित हसापुरे यांना जवळच्या लोकांनी दगा दिला होता. त्यामुळे हसापुरे यावेळेस मोठा शब्द घेतल्याशिवाय गप्प बसणार नाहीत हे नक्की. या दोन्ही निवडणुकीनंतर सोलापूर महापालिकेची निवडणूक होणार आहे. या निवडणुकित काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसची आघाडी झाली नाही तर पुन्हा एकदा आमदार प्रणिती शिंदे आणि दिलीप माने कार्यकर्त्यांसाठी एकमेकांसमोर उभे राहण्याची शक्यता आहे. मागील निवडणूक दिलीप माने यांनी शहरमध्य मधून लढवली होती. येथून त्यांना ३० हजारांच्या आसपास मते मिळाली आहेत. या मतदारसंघातून ज्यांनी दिलीप माने यांना मदत केली आहे त्यांना माने यांनी महापालिका निवडणुकित सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे दिलीप माने महापालिका निवडणुकित शहर मध्यमध्येही त्यांचे स्वतःचे उमेदवार निवडणुकिसाठी उभे करणार यात कोणतीही शंका नाही. त्यामुळे पुन्हा एकदा शिंदे आणि माने समोरासमोर येण्याची शक्यता नाकारता येत नाही. एकेकाळी एकाच पक्षात असलेल्या हसापुरे आणि माने यांनी विविध पक्षांचे पर्याय निवडल्यामुळे आगामी काळात थोडी विचित्र परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सध्या एकमेकांमध्ये सूर आळवलेले हे नेते आगामी काळात कोणती भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# ग्रामपंचायत निवडणुकीनंतर अनेक गावात अडवा-अडवी



**संजय पाटील**

माळशिरस तालुक्यातील ३५ ग्रामपंचायतींच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या. यानंतर अनेक गावात सध्या सुरु आहे अडवा आडवी, जिरवा जिरवीचे राजकारण. यामध्ये गाव गाड्यात सध्या विजयी झालेली पार्टी व सदस्य जल्लोष करीत आहेत तर दुसरीकडे ज्या पार्टीचा उमेदवारांचा पराभव झाला आहे. ते आपला पराभव का झाला? आपल्याला कोण मतदान केले नाही? मग यामध्ये भावकी असो की इतर कोणी असो. त्याचा शोध घेऊन जिथे ज्याला अडविता येईल तिथे अडवा आडवी सुरु झाल्याचे चित्र अनेक गावात पाहवयास मिळत आहे. मग मतदान दिले नाही म्हणून रस्ता अडविणे,ऊसाची कारखान्याला जाणारी वाहने अडविणे किंवा पाठीमागील भांडणाचा राग धरुन मतदान दिले नाही म्हणून एक प्रकारे बदला घेण्याचे काम सध्या अनेक गावात सुरु असल्याचे विदारक चित्र पाहवयास मिळत आहे.

निकाल लागल्यापासून पिलीव परीसरातील पोलीस ठाण्यात दररोज तक्रार असल्याचे विदारक चित्र पाहवयास मिळत आहे. याचा भविष्यात वाईट परीणाम होऊ शकतो. कारण यामध्ये मुख्य पुढारी भांडत नसून सामान्य कार्यकते एकमेकांना भांडत असल्याचे विदारक चित्र आहे. हे कार्यकर्ते अक्षरशः एकमेकांना मारहाण करीत आहेत. पण लोकशाहीला अशा घटना अतिशय मारक ठरतील. यामध्ये जिवितहानी होऊ शकते. खरे तर जनतेने आपल्याला पराभूत केले आहे म्हटल्यावर लोकशाही मार्गाने पुन्हा मोठ्या जोमाने काम करुन पुढील निवडणुकित कामाच्या जोरावर निवडणूक जिंकणे अपेक्षित आहे. पण बऱ्याच पुढाऱ्यांना आपला झालेला पराभव जिव्हारी लागलेला स्पष्ट दिसत आहे. लोकशाहीला अपेक्षित नसणाऱ्या घटना सध्या अनेक गावात घडत आहेत हे अत्यंत दुर्दैवी आहे.



# प्रशांत परिचारक यांच्या विरोधात कणखर मराठा नेतृत्वाची गरज

**सूरज सरवदे**

नुकत्याच झालेल्या पंढरपूर अर्बन बँकेच्या निवडणुकीमध्ये परिचारकांनी विरोधकांना उमेदवारी अर्ज भरण्यासाठी आवश्यक पूर्तता असलेले उमेदवार मिळू दिले नाहीत. यावरूनच परिचारक यांच्या विरोधात पंढरपुरात कार्यरत असलेल्या समविचारी आघाडीच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. परिचारक यांच्या विरोधातील निवडणुका जिंकण्यासाठी कणखर मराठा नेतृत्वाची गरज आहे. स्व. आमदार भारतनाना भालके यांच्यानंतर मराठा नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली आहे. हा विचार करता अभिजीत पाटील यांच्याकडे भविष्यातील नेतृत्व जाण्याची शक्यता आहे.

मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी अर्बन बँक निवडणूक समविचारी आघाडीच्या माध्यमातून लढवण्याचे जाहिर केले होते. मात्र या निवडणुकीमध्ये दिलीप धोत्रे एकाकी पडल्याचे पाहायला मिळाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक प्रदेशाध्यक्ष श्रीकांत शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष भोसले यांनी केवळ दिलीप धोत्रे यांना साथ दिली. मंगळवेढामध्ये समाधान आवताडे यांच्या विरोधात प्रशांत परिचारक आणि भगीरथ भालके यांची सविचारी आघाडी कार्यरत आहे. आमदार समाधान आवताडे यांच्या विरोधात समविचारी आघाडीच्या माध्यमातून तिथे निवडणुका लढवण्याची त्यांची व्यूवरचना आहे तर पंढरपूर मध्ये परिचारक यांच्या विरोधात दिलीप धोत्रे भगीरथ भालके कल्याणराव काळे यांची आघाडी आहे.

> परिचारक यांच्याकडे कार्यकर्त्यांचं मोठं जाळ आहे. सर्व समाज घटकांचे पॉकेट्स त्यांच्याकडे आहेत. विविध संस्थांवर विविध समाजाच्या प्रतिनिधींना परिचारक संधी देत आले आहेत. त्यामुळे पंढरपूर नगरपालिका जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्ये परिचारक गटाचे एक हाती वर्चस्व आहे.

अर्बन बँकेच्या निवडणुकीमध्ये भगीरथ भालके आणि कल्याणराव काळे यांनी परिचारक यांच्या विरोधात निवडणूक लावण्याबाबत रस दाखवला नाही. निवडणुकीच्या निकषात बसणारे सभासद नाहीत तसेच आपल्या विचाराचे सभासद नसल्यामुळे ते निवडणुकीपासून अलिप्त असावेत. प्रशांत परिचारक यांच्या साम्राज्याला धक्का पोहोचवायचे असेल तर सक्षम मराठा नेतृत्व पुढे यायला हवे. भालके परिचारक यांची मंगळवेढा येथे समविचारी आघाडी आहे. त्यामुळे पंढरपुरात परिचारक यांना भगीरथ भालके थेट विरोधात करणार का? असा प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. तसेच कल्याणराव काळे यांचे प्राबल्य काही गावापुरते मर्यादित आहे. त्यामुळे साखर कारखानदारीत नावाजलेले विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांच्यासारख्या नेतृत्वाने पुढे येऊन पंढरपूर नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका लढवण्याची तयारी करावी तर कुठेतरी परिचारक यांना शह मिळण्याची शक्यता आहे,असा सूर पंढरपूरच्या राजकीय क्षेत्रात उमटत आहे.

# इंदापूरला चाललेल्या उजनीच्या पाण्यावरून इतना सन्नाटा क्यू है भाई?

**हर्षल बागल**

करमाळा तालुक्यातील चिकलठाण ,वांगी १-२-३-४, कोंढार चिंचोली ,कात्रज, टाकळी ,खादगाव ओमलवाडी ,केतुर एक व दोन ,कुगांव ,दहिगांव, विवरवाडी, बिटरगाव, सांगवी एक आणि दोन, केडगाव ,वाशिंबे, सोगाव पूर्व पश्चिम ,पोपळज ,उमरड ,रितेवाडी अशा ३९ गावांना लाकडी निंबोळी योजनेला देत असलेल्या एक टीमएसी पाण्याचा फटका बसणार आहे. कारण ही सर्व गावे उजनी बॅक वॉटरच्या पट्ट्यात येतात. लाकडी निंबोळी योजनेला लवादाच्या पाणी वाटपात फेरबदल करून भीमा नदीवर एक टीएमसी पाणी अतिरिक्त दाखवून तेच पाणी उचलले जात आहे. भविष्यात एक टीएमसी म्हणत म्हणत पाच टीएमसी पाणी जाऊ शकते. त्यावेळी मात्र ही ३९ गावे स्मशानात बदललेली असतील.

जिल्ह्याच्या विकासाला व कृषी क्षेत्राला अधिक गतिमान बनवण्यासाठी यशवंतराव चव्हाण यांनी उदात्त हेतूने उजनी धरणाची निर्मिती केली. ज्वारीचे कोठार असलेला सोलापूर जिल्हा हा उजनीमुळे ऊस पट्ट्याचा जिल्हा म्हणून ओळखला जावू लागला. २०१९ साली राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आले. जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाचा इंदापूरचे आमदार दत्तात्रय भरणे यांनी पदभार स्वीकारला आणि भरणे यांची पालकमंत्रीपदाची अडीच वर्षाची कारकिर्द ही ऊजनीचे पाणी पळवण्यासाठीच गाजली. भरणे यांच्या विरोधात सोलापूर जिल्हा एक दिलाने रस्त्यावर उतरला. अगदी त्याच्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रस्त्यावर होते. शेतकरी संघटनाही रस्त्यावर उतरल्या होत्या. पवार प्रेमी असलेल्या माढ्याच्या आमदार बबनदादा शिंदे यांनी आमदारकीचा राजीनामा देऊ, असा इशारा दिला होता. तर करमाळ्याच्या आमदार संजयमामा शिंदे यांनी मंत्रालयात तत्कालीन जलसंधारण व जलसंपदा मंत्री जयंत पाटलांचा पिच्छाच सोडला नाही. आ.शिंदे हे स्थगितीचे पत्र घेऊनच जिल्ह्यात आले.

अकलूजच्या मोहिते पाटलांचा आणि जेऊरच्या नारायण पाटलांचा आवाज त्या वेळेला भरणे व बारामती करांवर चांगलाच गर्जत होता. बारामतीला टारगेट करणे याचा हेतू मोहिते पाटलांचा, नारायण पाटलांचा वेगळा असू शकतो.

पण आज पुन्हा कागदांवर उजनीचे तीन टीएमसी पाणी जास्त दाखवत तो पळवण्याचा घाट रचला गेला. त्यातील दोन टीएमसी पाणी मंगळवेढ्याच्या उपसा सिंचन योजनेला म्हणून जाहीर झाले आणि एक टीएमसी हे इंदापूरच्या लाकडी निंबोळी योजनेला. पण याच्यात करमाळ्याच्या बॅक वॉटरच्या गावांचा घोट घेण्याचा हा एक प्रकारे प्रयत्न आहे. राष्ट्रवादी काँग्रेस व ठाकरे यांच्या सरकारच्या वेळी सर्व पक्ष मैदानात उतरले होते. आता शिंदे - फडणवीस यांच्या सरकारमध्ये इंदापूरला पाणी जात असताना सोलापूर जिल्ह्यातील शिंदे गट आणि भाजप गटाच्या नेत्यांच्या गोठ्यात एवढा सन्नाटा क्यु है भाई? अशी विचारायची वेळ आली आहे. अकलूजचा मोहिते पाटलांनी आणि जेऊरच्या नारायण पाटलांनी ठाकरे आणि पवारांना



त्या काळात टार्गेट केले होते. आता नारायण पाटलांचे नेते असलेले एकनाथराव शिंदे हे मुख्यमंत्री आहेत. तर भाजपच्या विधान परिषदेवर आमदार असलेले मोहिते पाटील हे राज्यात आणि केंद्रात देखील सत्तेत आहेत. चाललेले पाणी थांबवून शिंदे- फडणीस सरकारमध्ये आमचं बी चालतंय हे दाखवण्याची चालून आलेली संधी आहे. आता सोलापूर जिल्ह्याचे एक टीएमसी पाणी कागदावर दाखवून ते लाकडी निंबोळी योजनेला चाललंय तरीही त्यांची चिडीचूप कशासाठी? की इंदापूरच्या पाण्याला यांची मूकसंमती आहे का असाही सूर राजकीय वर्तुळात दिसतोय.

> लवादाच्या पाणी वाटपाच्या तरतुदीत फेरबदल केला असल्याचा अनेकांना संशय आहे. पुणे जिल्ह्यातील येणारं सांडपाणी याचा टक्का वाढलाय. तसेच भीमानदीवर अतिरिक्त पाणी शिल्लक राहत आहे. अशी कागदं रंगवली असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. कागदावर तीन टीएमसी पाणी दाखवले आणि त्यातील दोन टीएमसी पाणी मंगळवेढ्याला तर एक टिएमसी पाणी नियोजित केले आहे. अतिरिक्त दाखवलेले पाणी चुकीचे असल्याची प्रतिक्रिया आ. शिंदे बंधुनी दिलेली आहे. उजनीच्या पाण्यावर सरकारमध्ये असलेले मोहिते पाटील, नारायण पाटील, प्रशांत परिचारक , विजयकुमार देशमुख , सुभाष देशमुख , आ. शहाजी पाटील , सचिन कल्याणशेट्टी, राजेंद्र राऊत यांच्यात सन्नाटा का व कशासाठी हे अद्याप समजले नाही.